इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९८
दि. २५/०३/२०२६

दुख:वटा ठराव

समाजातील सर्व स्तरातील कामगारांना आपले जीवन अर्पण करणारे शांत, संयमी, अभ्यासू कामगार अशी इचलकरंजी शहराच्या औद्योगीक क्षेत्रामध्ये ओळख असणारे जेष्ठ कामगार नेते अशोक उर्फ शामराव श्रीपाद कुलकर्णी यांचे रविवार दि. २१/०३/२०२६ रोजी दुख:द निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने इचलकरंजी शहराच्या औद्योगीक क्षेत्रातील मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

त्यांच्या निधनाने कुलकर्णी कुटुंबियांवर ओढवलेल्या दु:खात आजची सभा सहभागी होत आहे.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो.

सूचक : सु. बा. कलगते.

अनुमोदक : सं. बा. शेळके.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

ठराव क्र. ९८
दि. २५/०३/२०२६

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

अभिनंदनाचा ठराव

विषय- राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये श्रेणिक दलवाईने मिळवले रौप्य पदक

महाराष्ट्र राज्य रायफल असोसिएशन च्या मान्यतेने ३ व ४ मार्च रोजी डेरवण येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय डेरवण युथ गेम्स २०२६ या खुल्या नेमबाजी स्पर्धेमध्ये श्रेणिक सदानंद दलवाई याने दहा मीटर एयर पिस्टल या प्रकारात १७ वर्ष वयोगटामध्ये ४०० पैकी ३७१ एवढे गुण प्राप्त करून रौप्य पदक मिळवून अकॅडमीचे नावलौकिक केले त्याला आई ध्रुवती दलवाई व वडील सदानंद दलवाई यांचे सहकार्य लाभत आहे... तसेच या स्पर्धेमध्ये तृप्ती चौगुले, सृष्टी खटाळे, यशश्री परमाज, मौर्य हुवाळे, समर्थ कांबळे. आणि मुस्कान मुलांणी यांनीही कौतुकास्पद कामगिरी केली.. हे सर्वजण सध्या गांधीनगर निगडेवाडी येथील ड्रीम ओलंपियन शूटिंग अकॅडमी येथे सराव करत असून त्यांना आंतरराष्ट्रीय नेमबाज अनुराधा खूडे व समीर मुल्लानी यांचे मार्गदर्शन लाभत असून पालकांचे प्रोत्साहन लाभत आहे .

आपल्या सर्व इचलकरंजीच्या दृष्टीने हि आनंदाची आणि अभिमानाची घटना आहे. आजच्या महासभेच्या वतीने अभिनंदनाचा ठराव करणेत येत आहे.

सूचक- श्री. ते. अ. कोलपे

श्री. अ. अ. [illegible].

अनुमोदक- [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. २०
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. १ : मागील सभा दि. २०/०२/२०२६, ०२/०३/२०२६, ०९/०३/२०२६ इ. रोजी झालेल्या मा. महासभांचे इतिवृत्त कायम करणे.

ठराव

मागील सभा दि. २०/०२/२०२६, ०२/०३/२०२६, ०९/०३/२०२६ इ. रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त प्र. नगरसचिव यांनी सभेसमोर वाचुन दाखवले ते योग्य व बरोबर असलेने कायम करणेत येत आहे.

सूचक : सु. बा. कणगले.

अनुमोदक : सौ. स. प्र. भिसे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Mobile No

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
विशेष सभा

ठराव क्र. २१
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. २ : इचलकरंजी महानगरपालिका विशेष समित्यांचे अधिकार क्षेत्र निश्चित करणेस तसेच महासभेकडुन विशेष समित्यांना अधिकार व कर्तव्ये प्रत्यायोजीत करणेबाबत.

ठराव

इचलकरंजी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक झाली असुन, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती, शिक्षण समिती व मागासवर्गीय कल्याण समिती या विशेष समित्या गठीत करणेत आल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० पोटकलम (२) नुसार महानगरपालिकेस तिच्या सभेत उपस्थित असलेल्या व मत देणाऱ्या पालिका सदस्यांपैकी कमीत कमी दोन तृतीयांश पालिका सदस्यांनी मत देवून पारित केलेल्या विशिष्ठ ठरावाद्वारे प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित करता येईल आणि अशा कोणत्याही क्षेत्रात समाविष्ट केलेल्या सर्व बाबी व प्रश्न प्रथमतः समुचीत समितीपुढे ठेवले पाहिजेत व ते अशा समितीच्या शिफारशीसह महानगरपालिकेस सादर केले पाहिजे असा निदेश देता येईल, तसेच महानगरपालिकेस, तशाच ठरावाद्वारे आपले अधिकार व कर्तव्ये यापैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये सदर विशेष समित्यांकडे प्रत्यायोजीत करता येतील अशी तरतुद आहे.

इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये महिला व बालकल्याण समिती, शिक्षण समिती व मागासवर्गीय कल्याण समिती या विशेष समित्या गठीत करणेत आलेल्या आहेत. अधिनियमातील तरतुदीनुसार सदर विशेष समित्यांचे क्षेत्र निश्चित करणेकामी मा. महासभेमध्ये निर्णय होणेसाठी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

त्यानुसार,

परिवहन - अधिनियमातील तरतुदी व वाहन विभाग वाहने खरेदी / विक्री, देखभाल दुरुस्ती, नियंत्रण.

शिक्षण - म.न.पा. प्राथमिक शाळा शिक्षक व विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी दुर करणे, शिक्षण प्रसारासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देणे. शालेय विद्यार्थी व क्रिडा विभागाकडील क्रिडांगणे व व्यायामशाळा यांचे नियंत्रण, क्रिडा स्पर्धा आयोजीत करणे, क्रिडा साहित्य उपलब्ध करुन देणे.

मागासवर्गीय समिती - महसुली उत्पन्नातुन बांधील खर्च वजा जाता राहणाऱ्या उत्पन्नातील ५ % रक्कम मागासवर्गीय (SC / ST / NT) वर्गाचे उन्नतीसाठी खर्च करणेसाठीची आवश्यक कामे करणे, याबाबतची शिफारस स्थायी समिती /महापालिकेकडे करणे.

महिला व बालकल्याण समिती - शासन निर्णयाप्रमाणे योजना राबवणे.

प्रभाग समिती — महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (७) नुसार नेमुण देणेत आलेली कामे.

इचलकरंजी महानगरपालिकेच्या वरील प्रमाणे विशेष समित्यां व प्रभाग समिती मार्फत तयार करणेत आलेले प्रस्ताव हे सदर विशेष समित्यांच्या व प्रभाग समित्यांच्या शिफारशीसह योग्य त्या प्राधिकरणाकडे मंजुरीसाठी सादर करणेत यावेत.

सूचक : विकास पुंडलिक चोपडे

अनुमोदक : A.P. Bachate सौ. अरुणा प्रमोद जाचाटे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

ठराव क्र. २२
दि. २५/०३/२०२६

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

विषय क्र. ३ : इचलकरंजी महानगरपालिकेचे मा. महापौर, सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व मा. सदस्य यांना मानधन / भत्ते देणेस तसेच सभासदांना सभेस उपस्थित असलेबाबतचा भत्ता अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

ठराव

इचलकरंजी महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक होवून महानगरपालिकेचे महापौर, उपमहापौर, सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता यांची नियुक्ती झाली आहे. यासोबतच सर्व सभासदांना सभा भत्ता देणेबाबतचा कार्यालयीन प्रस्ताव वाचून दाखविनेत आला.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १९ अ (१) नुसार राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने महानगरपालिकेस या कलमामुळे, महानगरपालिकेने केलेल्या नियमांद्वारे विहित करणेत येईल असे मानधन, फी किंवा अन्य भत्ते प्रत्येक पालिका सदस्याला देता येतील.

शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र १२८/नवि २० दि. १५ जुलै २०१७ नुसार महानगरपालिकेतील सदस्यांचे मानधन (दुरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल या बाबींवरील खर्च लक्षात घेवून) ड वर्ग महापालिकेसाठी मासिक मानधन रु. १०,०००/- निश्चित करणेत आले आहे. यानुसार आपले महापालिकेचे सर्व सदस्यांना मासीक रु १०,००० /- भत्ता देणेत यावा.

कलम १९ अ (१) नुसार महानगरपालिकेने राज्य शासन वेळोवेळी आदेशाद्वारे निर्धारित करेल एवढी रक्कम दरवर्षी आतिथ्य भत्ता म्हणून महापौरांकडे सुपुर्द केली पाहिजे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एम एम सी- १२९७/८५५/प्र.क्र. ६३/नवि २४ दि. ०२ जुन २००१ नुसार खालील प्रमाणे प्रतीवर्षी आतिथ्य भत्ता उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत आली आहे.

महानगरपालिकांचे वार्षिक उत्पन्न	अनुज्ञेय आतिथ्य भत्ता
१०० कोटी पर्यंत	६०,०००/-
१०१ ते ४०० कोटी	९०,०००/-
४०१ ते १००० कोटी	१,००,०००/-
१००१ कोटी च्या वर	२,००,०००/-

आपले महापालिकेचे आर्थीक उत्पन्न १०१ ते ४०० कोटी असलेने महानगरपालिकेचे महापौरांना वार्षीक रु. ९०,०००/- इतका अतिथ्य भत्ता देणेत यावा.

कलम १९ एक अ (२) नुसार सभागृह नेता यांना मानधन, भत्ते व इतर सुविधा देण्याबाबत महानगरपालिकेने केलेल्या विनियमाद्वारे तरतुद केल्यानुसार मानधन भत्ते व इतर सुविधा देण्यात येतील.

कलम १९ एक अ अ (२) नुसार विरोधी पक्ष नेता यांना मानधन, भत्ते व इतर सुविधा देण्याबाबत महानगरपालिकेने केलेल्या विनियमाद्वारे तरतुद केल्यानुसार मानधन भत्ते व इतर सुविधा देण्यात येतील.

सदर तरतुदीनुसार इचलकरंजी महानगरपालिकेचे सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता यांना महापालिकामध्ये स्वतंत्र दालन लिपिक शिपाई यांची व्यवस्था करण्यात यावी यांचे साठी प्रत्येकी स्वतंत्र वाहन व्यवस्था महापालिकेकडून करण्यात यावी त्यांना प्रत्येकी वार्षिक ३० हजार रुपये अतिथ्य भत्ता देण्यात यावा

सभेचा भत्ता-

शासन निर्णय नगरविकास विभाग क्र. संकिर्ण- २००४/४६८/प्र.क्र. ८४/०४ नवि २० दि. २४ जानेवारी २००५ नुसार महानगरपालिका सभेसाठी उपस्थित राहणाऱ्या सभादांना खालील प्रमाणे सभेचा भत्ता देय आहे.

एक दिवसासाठी सभेला / सभांना हजर असलेल्या पालिका सदस्यांना रु. १००/- इतका असेल (रु. १००.०० प्रति दिवस). परंतु अशा सभेला गणपूर्ती असावी आणि सभेचे कामकाज झालेले असणे आवश्यक आहे.

अनेक वेळा एकाच दिवशी एकापेक्षा जास्त सभा होतात. उदाहरणार्थ सकाळी १०.३० वाजता स्थायी समिती सभा व सायंकाळी ४.३० वाजता सर्वसाधारण सभांचे आयोजन होऊन दोन्ही सभा संपन्न झाल्या व सभेत कामकाज झालेले असले तरी

त्या दिवसासाठी फक्त रु. १००/- इतकाच सभा भत्ता देय होईल. सभा भत्ता एका दिवसात सभेला हजर असल्याबद्दल आहे. मग एक सभा असो की एकापेक्षा जास्त सभा असोत. सभा भत्ता एक दिवसासाठीच देय होईल.

सभा भत्ता हा महानगरपालिकेची विशेष सभा, मासिक सभा, तहकूब सभा, स्थायी समिती सभा, विशेष समिती सभांसाठी उपस्थित सदस्यांसाठीच देय राहील. तहकूब सभांच्या बाबतीत गणपूर्तीची आवश्यकता नाही. अशा परिस्थितीत सभा भत्ता देय होईल परंतु सभेत कामकाज होणे आवश्यक आहे. सभा भत्त्यांची रक्कम अग्रीम स्वरूपात देय होणार नाही.

सभा भत्ता एक महिन्यासाठी जास्तीत जास्त रु. ४००/- इतका असेल एखाद्या महिन्यात ४ दिवसांपेक्षा जास्त दिवस सभा झाल्यास सभा भत्त्याची कमाल मर्यादा रु. ४००/- इतकी आहे. शासन निर्णयाप्रमाणे इचलकरंजी महापालिकेच्या सदस्यांना सभा भत्ता देणेत यावा.

सूचक : नि. कि. पोवार

अनुमोदक : सु. बा. कणगले.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
विशेष सभा

ठराव क्र. २४
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. ५ : पंचगंगा नदीस येणारे संभाव्य महापुर काळात करणेत येणारे उपाययोजना बाबत मा. महासभेमध्ये चर्चा करुन निर्णय घेणेबाबत.

ठराव

इचलकरंजी शहरात प्रतीवर्षी पुराचा धोका संभवत आहे. इचलकरंजी शहरामध्ये पंचगंगा नदीची पाण्याची पातळी वाढल्याने सन २०१९,२०२१,२०२४ साली महापुर आलेला होता. नदीमध्ये पाण्याची पातळी वाढल्यानंतर शहरामधून वाहणारे दोन मुख्य काळा ओढा व चंदूर ओढ्यात पाण्याचा निचरा न झालेस ओढ्यातील पाणी नागरी वस्तीमध्ये पसरते इचलकरंजी शहरात पुराचा धोका निर्माण होणेसाठी अतिवृष्टि, कृष्णा नदीचा पुर, अलमट्टी धरण इ. अनेक कारणे आहेत.

तसेच नुकताच यशोदा पुल याठिकाणी नविन पुलाचे बांधकाम करणेत आलेले आहे. वरीलठिकाणी ओढ्याचे पात्रामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ जमा झालेला आहे. नदीत व ओढ्यामध्ये मोठ्या प्रमाणात केंदाळ वनस्पती वाढली आहे. नविन पूल बांधलेल्या ठिकाणी देखील राडारोडा पडला आहे. त्यामुळे पात्राची ऊंची कमी होऊन पाणी वहाण्याची क्षमता कमी झाली आहे. त्यामुळे पाण्याचा निचरा न होता पुराचे पाणी शहरामध्ये पसरण्याची शक्यता वाढते. तसेच पंचगंगा नदीकडे शहरातील मुख्य रस्ता हा मरगुबाई मंदिर ते पंचगंगा नदी घाट पर्यंत रस्ता हा भराव टाकून केला असलेने सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूस पावसाचे पाणी साठत आहे. व त्याचा निचरा होत नाही या कारणास्तव सदर रस्त्याखालून बॉक्स कलव्हर्स्ट तयार केलेस लक्ष्मी दड्डू या परिसरात साचणारे पाणी त्वरित निचरा होणार आहे याकरीता सदर रस्त्याच्या खालून नदिवेस ते पेट्रोलपंप या रस्त्यावर किमान ०४ ठिकाणी कलव्ह उभारणे आवश्यक आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता ओढ्यामधील गाळ काढणे केंदाळ काढणे तसेच यशोदा पुलाजवळील राडारोडा काढणे गरजेचे आहे. जेणेकरून पुरपरिस्थिति आटोक्यात राहील.

वर नमूद केलेल्या कामासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

तात्पुरती उपाययोजना :- शहरातील वर नमूद केलेल्या ठिकाणी गाळ व केंदाळ काढणे.

कायमस्वरूपी उपाययोजना लक्ष्मी दड्डू (४ ठिकाणी) बॉक्स कलवर्ट बांधणे

वरील प्रमाणे कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी कार्यालयीन प्रस्तावानुसार पंचगंगा नदीस येणारा संभाव्य महापुर टाळण्यासाठी तात्पुरत्या उपाययोजने अंतर्गत प्रस्तावात नमुद प्रमाणे गाळ व केंदाळ काढणेस व याकामी येणारे खर्चास मंजुरी देणेत येत आहे व कायम स्वरुपी उपाययोजने अंतर्गत लक्ष्मी दड्डू (४ ठिकाणी) बॉक्स कलवर्ट बांधणेस व याकामी येणारे खर्चास मंजुरी देणेत आहे.

तसेच पंचगंगा नदीस महापुर आल्यास आपत्कालीन व्यवस्थापनाअंतर्गत उपाययोजना करणेसाठी इचलकरंजी महानगरपालिका अतिवृष्टी / पुर आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत करणेत येणाऱ्या उपाययोजना उदा. पुरस्थितीकाळात आपत्कालीन नियंत्रण कक्ष स्थापन करणे, आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे, आपत्कालीन परीस्थीती हाताळणे कामी विविध समित्या गठीत करणे, शहरातील सारण गटार व नाले स्वच्छ करणे, धोकादायक इमारतींचा सर्वे करुन त्यांना नोटीस लागु करणे, पुरग्रस्तांकरीता विविध भागांत पुणर्वसन छावण्या निश्चित करणे व सदर छावण्यांच्या ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करुन देणे, जनावरांसाठी छावण्या तयार करणे व जनावारांसाठी चारा उपलब्ध करुन देणे, पुरग्रस्त भागातील नागरीकांची कौटुंबिक साहित्य पुरग्रस्त छावण्यांच्या ठिकाणी हालविणे, पुरग्रस्तांना जेवण पाणी व नाष्ट्याची सोय करणे, पुरग्रस्तांसाठी केलेला निवारा केंद्र / छावनी च्या ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे, पुरबाधीत क्षेत्रामध्ये फ्लड लाईटची व्यवस्था करणे, धोकादायक पथदीप पोल बदलणे अथवा काढणे, महावितरणशी समन्वय साधुन विद्युत पुरवठा सुरळीत ठेवणेबाबत संपर्कात राहणे, होर्डींग्ज-डिजीटल होर्डींग्ज यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे, धोकादायक वृक्ष व फांद्या तरुसमितीच्या माण्यतेने तोडणे, शहरातील, पुरबाधीत भागातील रस्त्यांवरील खड्डे मुजविने, पुरबाधीत क्षेत्रातील अतिक्रमणे काढणे, मजरेवाडी, पंचगंगा नदीचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे, पुरस्थिती काळात आवश्यक असणारे सर्व औषधे उपलब्ध करणे, सखल भागात पाणी साचल्यास पाण्याचा निचरा करणेसाठी जे.सी.बी. पोकलॅन उपलब्ध करणे, पुर ओसरल्यानंतर पुरग्रस्त भागात जंतुनाशके फवारणी, धुर फवारणी करणे. इ. व पुरपरस्थिती लक्षात घेता तातडीने ज्या त्या वेळी हाती घ्यावी लागणारी सर्व अनुषंगीक कामे हाती घेणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सूचक : विठ्ठल पुंडलिक चोपडे

अनुमोदक : A.P. Bachate

ठराव सर्वानुमते मंजुर सौ. अस्मिता प्रमोद बचाटे

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. २५
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. ६ : पंचगंगा नदी प्रदुषण बाबत करावयाच्या उपाययोजना तसेच सायझिंग उद्योगातुन निर्माण होणाऱ्या स्लजच्या शास्त्रोक्त व सुरक्षित व्यवस्थापनासाठी तात्पुरती उपाययोजना करणेसाठी महापालिकेच्या मलशुद्धीकरण केंद्राकडील दोन स्लज ड्रायिंग बेड सायझिंग उद्योगाच्या स्लज व्यवस्थापनासाठी तात्पुरत्या स्वरुपात वापरास मान्यता देणेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

ठराव

वरील विषयास अनुसरून दिनांक ४/०२/२०२६ रोजी मा.अतिरिक्त आयुक्तसो, यांचे दालनात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ,सायझिंग असोसिएशनचे प्रतिनिधी व महानगरपालिकेचे संबंधित विभागांचे अधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली.

सदर बैठीकीमध्ये पंचगंगा नदी प्रदूषणाबाबत करावयाच्या उपाययोजना तसेच सायझिंग उद्योगातून निर्माण होणाऱ्या स्लजच्या शास्त्रोक्त व सुरक्षित व्यवस्थापनासाठी तात्पुरती उपाययोजना म्हणून महानगरपालिकेच्या मलशुद्धीकरण केंद्राकडील दोन स्लज ड्रायिंग बेड वापरण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

वरील बाबीस अनुसरून, पंचगंगा नदी प्रदूषणाबाबत करावयाच्या उपाययोजना तसेच सायझिंग उद्योगातून निर्माण होणाऱ्या स्लजच्या शास्त्रोक्त व सुरक्षित व्यवस्थापनासाठी तात्पुरती उपाययोजना करणेकामी उपलब्ध स्लज ड्रायिंग बेडपैकी दोन स्लज ड्रायिंग बेड सायझिंग उद्योगाच्या स्लज व्यवस्थापनासाठी तात्पुरत्या स्वरूपात वापरणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी , पंचगंगा नदी प्रदूषणाबाबत करावयाच्या उपाययोजना तसेच सायझिंग उद्योगातून निर्माण होणाऱ्या स्लजच्या शास्त्रोक्त व सुरक्षित व्यवस्थापनासाठी तात्पुरती उपाययोजना करणेकामी उपलब्ध स्लज ड्रायिंग बेडपैकी दोन स्लज ड्रायिंग बेड सायझिंग उद्योगाच्या स्लज व्यवस्थापनासाठी एक वर्ष मुदतीकरीता मोफत वापरणेसाठी मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : सु. बा. कळगते

अनुमोदक : नि. कि. पोवार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

2686931

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. २६
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. ७ : महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका हद्दितील प्र.क्र. १२ मुरदंडे मळा येथील गल्ली नं १ येथील रस्त्याचे काम यापुर्वी पुर्ण झाले असलेने गल्ली नं १ या रस्त्याएवजी ए एस सी कॉलेज पश्चिम बाजुकडील चौरासीया घर ते हळदीकर घर / काजवे हॉस्पिटल पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणेबाबत श्री. अजित बाळकृष्ण जाधव (माजी नगरसेवक) यांनी पत्राद्वारे मागणी केले कामी कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्वावाचा विचार करणे.

ठराव

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.12 मध्ये मुरदंडे मळा, गल्ली.नं. १,२ व ३ ही कामे राज्यस्तरीय नगरोत्थान योजना सन - २०२३-२४ मधून मंजूर झालेल्या र.रू.५२ कोटी रक्कमेतून मंजूर आहेत. सदर कामांची कार्यान्वयीन यंत्रणा सार्व.बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन (मा.उपअभियंता) हातकणंगले यांचे कार्यालयामार्फत चालू आहेत. यापैकी गल्ली नं.२ व ३ मधील कामे अद्याप पुर्ण झालेली नाहीत. सदरची कामे सार्व.बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत पुर्ण होणार आहेत. तसेच गल्ली.नं. १ ची स्थळपाहणी केली असता, या रस्त्याचे काम यापुर्वीच पुर्ण झालेचे दिसून येते. त्यामुळे सदर गल्ली.नं. १ मध्ये पुन्हा नव्याने डांबरीकरण करणेची आवश्यकता नाही. त्यामुळे या रस्त्याऐवजी ए.एस.सी. कॉलेज पश्चिम बाजूकडील चौरसीया घर ते हळदीकर घर / काजवे हॉस्पिटल पर्यंतचा रस्ता म्हणजेच पाटील गल्ली या रस्त्याचे डांबरीकरणाचे कामे करून घ्यावे म्हणून श्री. अजित बाळकृष्ण जाधव (माजी नगरसेवक, इ.न.पा.) यांनी व श्री. नितेश पोवार, नगरसेवक यांनी केली आहे. तसेच प्र.क्र. १२ मधील म्हेतर घर ते प्रकाश पाटील घर या ठिकाणी मंजुर असलेली गटर सध्या आवश्यक नसलेने सदर गटर यशवंत कॉलनी येथे कारंडे घर ते प्रकाश बोरा घर येथे करणेबाबत सुरेखा अजितमामा जाधव, नगरसेविका व नितेश पोवार, नगरसेवक यांनी पत्राव्दारे मागणी केलेली आहे.

तरी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका हद्दितील प्र.क्र. १२ मुरदंडे मळा येथील गल्ली नं १ येथील रस्त्याचे काम यापुर्वी पुर्ण झाले असलेने गल्ली नं १ या रस्त्याएवजी ए एस सी कॉलेज पश्चिम बाजुकडील चौरासीया घर ते हळदीकर घर / काजवे हॉस्पिटल पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणेस, तसेच प्र.क्र. १२ मधील म्हेतर घर ते प्रकाश पाटील घर या ठिकाणी मंजुर असलेली गटर सध्या आवश्यक नसलेने सदर गटर यशवंत कॉलनी येथे कारंडे घर ते प्रकाश बोरा घर येथे करणेसही मंजुरी देणेत येत असुन सार्व. बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन (मा.उपअभियंता) हातकणंगले यांना सदर रस्त्याचे डांबरीकरण व गटरीचे कामाचे नावात बदल करणे बाबत कळविणेत यावे.

सूचक : सु. बा. कमतगे

अनुमोदक : सौ. व. प्र. मिसे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. २७
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. ८ : इचलकरंजी शहरातील वाहतुकीस अडथळा निर्माण करणारी बेवारस वाहने हटविणेबाबत मा. अनिल दे. डाळ्या, उपमहापौर यांनी दि. २७/०२/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेबाबत.

ठराव

मा. उपमहापौर इ.मनपा. श्री. अनिल शांतीदेवी देवकरण डाळ्या यांनी दि. २७/०२/२०२६ चे पत्रानुसार इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक मुख्य रस्त्यावर तसेच ठिकठिकाणी भागात बेवारस स्थितीत वाहने पार्क केलेली आहेत. त्यामुळे शहरात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. विशेषत: सकाळी व सायंकाळी शाळा ऑफिसच्या वेळेत नागरिक व शाळकरी मुलांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

पार्कींगच्या चुकीच्या पद्धतीमुळे व बेवारस वाहनामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब अत्यंत गंभीर असून सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे. सदर परिस्थितीवर प्रभावी तोडगा काढण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची तातडीची बैठक आयोजित करणे गरजेचे आहे असे संदर्भिय पत्रान्वये इकडे कळविले आहे.

या पुर्वी २०२२/२३ रोजी बेवारस वाहने जप्त करण्याची कारवाई आरोग्य विभागामार्फत राबविण्यात आलेली होती त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही होणेकरीता आरोग्य विभागामार्फत संदर्भिया पत्रातील मागणी प्रमाणे बैठक आयोजित करणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी शहरातील वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे बेवारस वाहने हटविणेसाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय व शहर वाहतुक शाखा यांचेशी संपर्क साधुन बेवारस वाहने हटविणेबाबत महानगरपालिकेमध्ये बैठक आयोजीत करुन सदरची वाहने हटविणेबाबतची कार्यवाही करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सदरची वाहने हटविणेपुर्वी दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिर नोटीस देवून संबंधीत वाहन मालक यांना सदरची वाहने हटविणेबाबत कळविणेत यावे. सदर नोटीसीनुसार जे वाहनमालक वाहने हटविणार नाहीत त्यांची वाहने जप्त करणेत यावीत.

सूचक : नि. कि. पोवार

अनुमोदक : सु. बा. कळगते

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. २८
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. ९ : इचलकरंजी शहरातील विविध भागामध्ये बंद अवस्थेतील व जीर्ण व निरुपयोगी सार्वजनिक शौचालये व इतर भंगार साहित्य यांची तात्काळ विल्हेवाट लावणेबाबत मा. अनिल दे. डाळ्या, उपमहापौर यांनी दि. २७/०२/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेबाबत.

ठराव

इचलकरंजी शहरातील विविध भागामध्ये बंद अवस्थेतील व जीर्ण व निरुपयोगी सार्वजनिक शौचालये व इतर भंगार साहित्य यांची तात्काळ विल्हेवाट लावणेबाबत मा. अनिल दे. डाळ्या, उपमहापौर यांनी दि. २७/०२/२०२६ चे पत्रानुसार मागणी केली आहे.

इचलकरंजी महानगरपालिका घन कचरा व्यवस्थापन विभाग अंतर्गत सार्वजनिक शौचालय स्वच्छता विभाग, स्वच्छता निरिक्षक व प्र. मुकादम यांनी फिरती करून इचलकरंजी शहरातील बंद पडलेली व पूर्णपणे जीर्ण झालेली शौचालये यांचा सर्वे केला आहे. त्यानुसार शहरातील खालील १५ ठिकाणी जीर्ण झालेली शौचालये निदर्शनास आली आहेत.

अ.क्र.	स्क्रॅप करावयाचे शौचालय
१	तोरणा नगर
२	टाकवडे रोड
३	लायकरमळा
४	खंजीरे इंडस्ट्री इस्टेट जवळ
५	के. एल. मलाबादेजवळ नगर
६	शांतीनगर शौचालयजवळ
७	जाधव मळा, लाखेनगर
८	महापालिका कार्यालयमागे
९	शहापुर खण कंजारभाट
१०	शहापुर शाळेमागील
११	महासत्ता चौक काळा वडा जवळ
१२	साईट नं.१०२ -२
१३	शहापुर कोकणे घरासमोर
१४	जवाहरनगर बाळकृष्णा चित्रमंदिरजवळ
१५	घोरपडे नाट्यगृह मागे

तरी इचलकरंजी शहरामध्ये वरील प्रमाणे नमुद १५ ठिकाणची जीर्ण झालेली फिरती शौचालये तसेच महानगरपालिका प्रशासकीय इमारत, महापालिका मालकीच्या इतर इमारती, मंगल कार्यालय, प्राथमिक शाळा, रा.छ. शाहु हायस्कुल, योग जिम्नॅशियम हॉल इ. ठिकानचे भंगार साहित्य तसेच अतिक्रमण विभागामार्फत जप्त करणेत आलेले साहित्य यांची तात्काळ ई-लिलाव प्रक्रिंया करुन विक्री करणेत यावी.

सूचक : सु. बा. कळगते.

अनुमोदक : नि. कि. जोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

2714663

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. २९
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. १० : इचलकरंजी शहरातील लहान मोठ्या १८ बागा व १३ ऑक्सिजन पार्क अशासकीय संस्थां (NGO), ट्रस्ट /सामाजिक संस्था यांना दत्तक तत्वावर देखभाल व्यवस्थेसाठी देणेबाबत मा. अनिल दे. डाळ्या, उपमहापौर यांनी दि. २७/०२/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेबाबत.

ठराव

इचलकरंजी शहरातील लहान मोठ्या १८ बागा व १३ ऑक्सिजन पार्क अशासकीय संस्थां (NGO), ट्रस्ट /सामाजिक संस्था यांना दत्तक तत्वावर देखभाल व्यवस्थेसाठी देणेबाबत मा. अनिल दे. डाळ्या, उपमहापौर यांनी दि. २७/०२/२०२६ चे पत्रानुसार मागणी केली आहे.

इचलकरंजी शहरातील महानगरपालिकेने खालील प्रमाणे १८ उद्याने व १३ ऑक्सिजन पार्क उभारली आहेत, सर्व उद्याने व ऑक्सिजन पार्क यांची दररोज स्वच्छता, देखभाल ,पाणी इत्यादी कामे करावी लागतात कर्मचाऱ्यांची आकृतीबंधानुसार मागणी केलेली आहे.

अ.क्र.	उद्यान
१	शहिद भगतसिंग उदयान
२	म.गांधी उदयान (सुंदर बाग)
३	राणी बाग
४	छ.शिवाजी उदयान
५	ज्ञानेश्वर उदयान
६	कमला नेहरु उदयान
७	जवाहरलाल नेहरू उदयान
८	रमा माता आंबेडकर उदयान
९	के.एल.मलाबादे उदयान
१०	बोध्द विहार उदयान
११	सिध्दी विनायक उदयान
१२	स्नेहदिप उदयान
१३	छ.संभाजी उदयान
१४	नाटयगृह उदयान
१५	सुनिल पाटील घरा शेजारील उदयान
१६	कागवाडे मळा उदयान
१७	छ.संभाजीराजे उदयान, आण्णारामगोंडा पाटील शाळेजवळ

अ.क्र.	ऑक्सिजन पार्क
१	गट नं. ८६,८७ शहापूर ऑक्सीजन पार्क
२	गट नं. ६८ आर.के.नगर पार्ट-१ ऑक्सीजन पार्क (पीठाची चक्की)
३	गट नं .६८ आर.के.नगर पार्ट-२ ऑक्सीजन पार्क (यशवंत रेसिडन्सी)
४	अ) रि.स.नं. ६१८ आरगे भवन ऑक्सीजन पार्क
	ब) रि.स.नं.६१५,६१८ पार्ट-१ ऑक्सीजन पार्क (आश्रम)
	क) रि.स.नं.६१५,६१८ पार्ट-२ ऑक्सीजनपार्क (आश्रम समोर दक्षिणेस)
५	गट नं. ४७ इंदिरा कॉलनी ऑक्सीजन पार्क (पाण्याची टाकी)
६	रि.स.नं. ५४९ कुरुंदवाडे मळा ऑक्सीजन पार्क
७	डॉ.बनकर हॉस्पिटलमागे वॉर्ड क्र १७
८	पंचवटी चित्रमंदिरमागे ऑक्सीजन पार्क (पाण्याची टाकी)
९	रि.स.नं. ५६२ ढवळे हॉस्पिटलमागे ओझा घराजवळील ऑक्सीजन

	पार्क (तानाजी मालूसरे उदयान)
१०	गट नं.३८६ कृष्णानगर ऑक्सीजन पार्क
११	थोरात चौक येथील ऑक्सीजन पार्क
१२	सावली सोसायटी ऑक्सीजन पार्क
१३	स्टार नगर

वरील प्रमाणे एकूण १७ उद्यान व १३ ऑक्सिजन पार्क असून त्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी कर्मचारी कमी असलेने वारंवार सफाई बाबत तक्रारी येत असतात तरी अनिल शांतिदेवी देवकरण डाळ्या, उपमहापौर इचलकरंजी महानगरपालिका यांनी दिलेल्या दि. २७/०२/२०२६ च्या पत्रान्वेय वरील उद्याने व ऑक्सिजन पार्क इचलकरंजी शहरातील N.G.O संस्थेकडे व्यवस्थापन व देखभालीसाठी सोपवलेस संबंधित संस्थेमार्फत नियमित देखभाल, स्वच्छता वृक्ष संवर्धन व सुरक्षा योग्य प्रकारे होण्यासाठी प्रभावी व्यवस्थापन N.G.O यांचे मार्फत होईल असे मा. उपमहापौर यांनी पत्रामध्ये नमुद केले आहे.
कार्यालयाने उद्याने / ऑक्सिजन पार्क हे N.G.O साठी देखभाल/ सफाई / स्वच्छता /सुरक्षासाठी देऊन अटी शर्ती तयार करुन N.G.O. कडे व्यवस्थापन व देखभालीसाठी देणेकामी मा.महासभेमध्ये चर्चा होऊन निर्णय होणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिकेची उद्याने व ऑक्सिजन पार्क देखभाल/ सफाई / स्वच्छता /सुरक्षा यासाठी सामाजीक संस्था (N.G.O.) यांचेकडे व्यवस्थापनासाठी देणेकामी खालील सदस्यांची समिती स्थापन करणेत येत आहे.

अ.क्र.	मा. सदस्यांचे नाव	पद
१	अनिल देवकरण डाळ्या	समिती अध्यक्ष
२	रुपा उदय बुगड	सदस्य
३	अभिषेक रमाकांत वाळवेकर	सदस्य
४	अमरजीत राजाराम जाधव	सदस्य
५	परवेज लतीफ गैबान	सदस्य

वरील समितीने उद्याने व ऑक्सिजन पार्क देखभाल/ सफाई / स्वच्छता /सुरक्षा यासाठी सामाजीक संस्था यांचेकडे देणेकामी अटी / शर्ती तयार करुन मा. महासभेच्या आगामी सभेमध्ये सादर कराव्यात. सदर अटी / शर्ती नुसार उद्याने व ऑक्सिजन पार्क देखभाल/ सफाई / स्वच्छता /सुरक्षा यासाठी सामाजीक संस्था यांचेकडे देणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : वि. कि. पोवार

अनुमोदक : सु. बा. कळगते

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ३०
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. ११ : पंतप्रधान आवास योजने अंतर्गत अनुदान मिळणेकामी बांधकाम परवाना अट शिथिल करणेबाबत सौ. विजया सुनील महाजन, सदस्या यांनी दि. ०६/०३/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेबाबत.

ठराव

उपरोक्त विषयास अनुसरून आम्ही आपणास सविनय सादर करतो की संदर्भीय पत्र क्र. १,२ व ३ अन्वये मा. नगरसेविका सौ. विजया सु. महाजन यांनी मा. महापौर व मा. आयुक्त यांच्याकडे निवेदन सादर करून, इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रामधील ज्या नागरीकांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत त्याच्या स्वप्नातील घर पूर्ण करणेची संधी मिळालेली आहे. अशा नागरीकांना या योजने अंतर्गत प्रत्यक्ष अनुदानाचा लाभ देताना बांधकाम परवानगी घेणेच्या अटीमधून शिथिलता देणेचे मागणी केलेली मा. नगरसेविका सौ. विजया महाजन यांनी निवेदन दिले आहे. तरी उक्त निवेदनाचे अवलोकन होणेकामी पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

उपरोक्त विषयास अनुसरून आम्ही आपणास सविनय सादर करतो की, संदर्भीय पत्र क्र. १.२ व ३ अन्वये मा. नगरसेविका सौ. विजया सु. महाजन यांनी मा. महापौर व मा. आयुक्त यांच्याकडे निवेदन सादर करून, इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रामधील ज्या नागरीकांना प्रधानमंत्री आवास

योजने अतर्गत त्याच्या स्वप्नातील घर पूर्ण करणचा सथा मिळालेला आहे. अशा नागरीकाना या योजन अंतर्गत प्रत्यक्ष अनुदानाचा लाभ देताना बांधकाम परवानगी घेणेच्या अटीमधून शिथिलता देणेचे मागणी केलेली आहे.'

सदरील मागणीच्या समर्थनात यांच्यामार्फत सदरील निवेदनामध्ये निम्नलिखीत बाबी नमुद करण्यात आलेले आहेत.

१) सदरील योजनेचा लाभ मिळालेल्या लाभार्थीची मिळकत ही सामान्यतः २०० ते ५०० चौ.मी.

क्षेत्रफळाची असते व कितेक वेळा सदरील मिळकत ही लाभार्थी यांच्या आजोबा वा पंजोबा यांच्या नावावर नोंदीकृत असते.

ii) लाभार्थीकडे त्यांच्या मिळकतीचा मोजणी नकाशा, रेखांकन नकाशा, बिगरशेती आदेश अशी कायदेशीरदृष्टया आवश्यक असणारी कागदपत्रे सामान्यतः नसतात. त्यामुळे हे लाभार्थी या योजने अंतर्गत प्रत्यक्ष अनुदानाच्या माध्यामातून लाभ मिळण्यास पात्र ठरत नाहीत.

iii) कितेक लाभार्थी यांना शासकीय कार्यपध्दती व बांधकाम परवानगी मिळणेबाबत आवश्यक माहिती नसल्यामुळे, असे लाभार्थी हे बांधकाम परवानगी काढत नाहीत.

iv) इचलकरंजी शहरातील मंजूर नगररचना योजना भागातील कितेक मिळकतींवर' क १ * असा शेरा पडलेला असल्यामुळे, अशा मिळकतींवरील सदरील शेरा कमी करून घेतल्याशीवाय संबंधीत लाभार्थी यांना बांधकाम परवानगी मिळकत नाही. तसेच कोणत्याही शासकीय बँकेकडून कर्ज ही मिळत नाही.

v) सबब, विषयांकीत निवेदन हे मा. महासभेच्या अजेंडयावर घेऊन, सदरील विषयामध्ये सन्मान जनक तोडगा काढून, मागेल त्याला परवाना ही योजना राबविण्यात यावी.

सदरील निवेदनाच्या अनुषंगाने आम्ही निम्नलिखीत कायदेशीर तरतूदी आपणांस अवलोकनी आणून देऊ इच्छितो.

१) महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ (१) मधील तरतूदींनुसार, कोणत्याही व्यक्तीमार्फत, कोणत्याही मिळकतींवर, कोणत्याही प्रकारचा विकास करण्यापूर्वी, अशा व्यक्तीनी संबंधीत नियोजन प्राधिकरण यांचेकडे विहीत करण्यात आलेल्या नमून्यामध्ये, निश्चित करून देण्यात आलेल्या कार्यपध्दतीव्दारे, आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांसह विनंती अर्ज सादर करणे आवश्यक व अनिवार्य आहे.

२) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मधील विनियम क्र. २.१.१ मध्ये असे स्वयंस्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे की, कोणताही व्यक्ती नियोजन प्राधिकरणाकडून विहीत मार्गाने आवश्यक विकास परवानगी घेतल्याशिवाय, त्याच्या मालकी वहीवाटीच्या कोणत्याही मिळकतीमध्ये कसल्याही प्रकारचा विकास करू शकणार नाही.

३) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मधील विनियम क्र. २.६.१ मध्ये बांधकाम परवानगी मिळकणेकरीता आवश्यक असलेल्या कागदपत्रा संबंधीत माहिती नमूद करण्यात आलेले असून, प्रत्यक विकासक बांधकाम परवानगीसाठी या विनियमात नमूद करण्यात आलेली कागदपत्रे सादर करणे अर्जदारास बंधनकारक आहे.

४) प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये लाभार्थी यांना सदरील योजनेचा लाभ देणेकरीता अवलंबण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीबाबत मा. महाराष्ट्र शासनाने वेळोवळी विविध शासन निर्णय व परिपत्रकाव्दारे मार्गदर्शक सूचना व निर्देश पारीत केलेले असुन, अशा कोणत्याही शासन निर्णयामध्ये वा परिपत्रकांमध्ये लाभार्थी यांना सरसकट कोणत्याही कागदपत्रांची शहानिशा न करता बांधकाम परवानगी देण्यात यावी, असे कोठेही नमूद करण्यात आलेले नव्हते व नाही.

५) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मधील विनियम क्र २.१.२ मध्ये नमूद करण्यात आलेल्या तरतूदीनुसार कोणत्या प्रकारच्या विकासास नियोजन प्राधिकरणाकडून विहीत मार्गाने बांधकाम परवावची घेण्याची आवश्यकता नाही, हे नमूद करण्यात आलेले आहे. परंतू सदरील विनियमामध्ये प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत येणाऱ्या लाभार्थी यांना कोणत्याही प्रकारची सवलत देण्यात आलेली असल्याचे निदर्शनास येत नाही.

उपरिनिर्दिष्ठ कायदेशीर तरतूदी व मा. शासनाने प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत निर्गमत केलेली विविध शासन निर्णय व परिपत्रके अवलोकनीय घेता, संदर्भीय निवेदनांच्या अनुषंगाने मागेल त्याला परवाना ही योजना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत येणाऱ्या लाभार्थीकरीता लागू करणे वैधानिक ठरणार नाही, असा कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत प्रत्यक्ष अनुदानाचा लाभ नागरिकांना मिळावा यासाठी पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत अनुदान मिळणेकामी बांधकाम परवाना अट शिथिल करणेबाबतचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेत यावा.

सूचक : नि. कि. पोवार

अनुमोदक : सु. बा. कलगते.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ३१
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. १२ : इचलकरंजी महानगरपालिका मा. महापौर यांचे निवासस्थानासाठी जागा निश्चित करणेबाबत.

ठराव

इचलकरंजी महानगरपालिका मा. महापौर यांचे निवासस्थानासाठी जागा निश्चित करणेबाबत महानगरपालिकेतील मंजूर व प्रारूप विकास योजनेचा तपशील अवलोकनी घेऊन, महानगरपालिकेच्या वापराकरीता आरक्षीत असलेल्या जागांची व मनपाच्या ताब्यात असलेल्या जागांची खालील प्रमाणे तपशीलवार माहिती कार्यालयाने सादर केली आहे.

अ.क्र.	**इचलकरंजी रि.स.नं.**	**मंजूर विकास योजना दि.२५/०५/१९८१**	**मंजूर नगररचना योजना क्र. अंतिम भूखंड क्रमांक**	**प्रारूप विकास योजना कमल २८(१) आणि ३०(१)**	**अंदाजे जागेचे क्षेत्र**
१.	५७५ पैकी.	आरक्षण क्र. ६६- प्रायमरी स्कूल	मंजूर नगररचना योजना क्र. I अंतिम भूखंड क्र. ५३३ पैकी.	रहिवास विभागामध्ये समाविष्ट	अंदाजे २० गुंठे
२.	५५७ पैकी.	रहिवास विभागामध्ये समाविष्ट	मंजूर नगररचना योजना क्र I अंतिम भूखंड क्र. ६३२/७३ अ	लूम इंडस्ट्री कम रेसिडेन्सिअल विभागामध्ये समाविष्ट	२३४७ चौरस यार्ड
३.	५७८ पैकी.	आरक्षण क्र. ७७ - डिस्पेन्सरी अॅण्ड मॅटर्निटी होम.	मंजूर नगररचना योजना क्र. I अंतिम भूखंड क्र. ५२६ पैकी	आरक्षण क्र. V/९- मॅटर्निटी होम.	०.४० हेक्टर,
४.	५८४ पै.	सार्वजनिक सुविधा	मंजूर नगररचना योजना क्र. I अंतिम भूखंड क्र. ६५९ पैकी	रिक्रीएशनल विभागामध्ये समाविष्ट, (G) (SD)	१६५५ चौ. यार्ड
अ.क्र.	**इचलकरंजी रि.स.नं.**	**मंजूर विकास योजना दि.२४/०५/२०१२**	**मंजूर नगररचना योजना क्र. अंतिम भूखंड क्रमांक**	**प्रारूप विकास योजना कमल २८(१) आणि ३०(१)**	**अंदाजे जागेचे क्षेत्र**
१.	शहापूर गट नं. २३५ पैकी, २६० पैकी, २५७ पैकी, २५८ पैकी.	मंजूर विकास योजना आरक्षण क्र. V/ ३७- व्हेजिटेबल मार्केट अँड शॉपिंग सेंटर.	--------	आरक्षण क्र. I ३५- व्हेजिटेबल मार्केट अँड शॉपिंग सेंटर.	०.६४ हेक्टर.
२.	कबनूर गट नं. ११० पै.	सार्वजनिक आणि निम सार्वजनिक विभागामध्ये समाविष्ट	-------	सार्वजनिक आणि निम सार्वजनिक विभागामध्ये समाविष्ट.	४०८ चौ.मी.

तरी इचलकरंजी महानगरपालिका मा. महापौर यांचे निवासस्थानासाठी जागा निश्चित करणेबाबत खालीलप्रमाणे समिती नियुक्त करणेत येत आहे.

अ.क्र.	मा. सदस्यांचे नाव	पद
१	उदय आनंदा धातुंडे	समिती अध्यक्ष
२	अनिल देवकरण डाळ्या	सदस्य
३	विठ्ठल पुंडलिक चोपडे	सदस्य
४	तानाजी बाळु पोवार	सदस्य
५	जुलेखा जहांगीर पटेकरी	सदस्य
६	उदयसिंग मारुती पाटील	सदस्य
७	रणजित गंगाराम जाधाव	सदस्य

सदर समितीने मा. महापौर यांचे निवासस्थानासाठी जागा निश्चित करुन तसा अहवाल मा. महासभेकडे सादर करावा.

सूचक : स्वा.बा.कलागते

अनुमोदक : नि.कि.पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

तरी इचलकरंजी महानगरपालिका मा. महापौर यांचे निवासस्थानासाठी जागा निश्चित करणेबाबत खालीलप्रमाणे समिती नियुक्त करणेत येत आहे.

अ.क्र.	मा. सदस्यांचे नाव	पद
१	उदय आनंदा धातुंडे	समिती अध्यक्ष
२	अनिल देवकरण डाळ्या	सदस्य
३	विठ्ठल पुंडलिक चोपडे	सदस्य
४	तानाजी बाळु पोवार	सदस्य
५	जुलेखा जहांगीर पटेकरी	सदस्य
६	उदयसिंग मारुती पाटील	सदस्य
७	रणजित गंगाराम जाधाव	सदस्य

सदर समितीने मा. महापौर यांचे निवासस्थानासाठी जागा निश्चित करुन तसा अहवाल मा. महासभेकडे सादर करावा.

सूचक : सु.बा.कलगते

अनुमोदक : नि.कि.पोवार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

ठराव क्र. ३२
दि. २५/०३/२०२६

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

विषय क्र. १३ : कबनुर हद्दीतील इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या वाढीव हद्दीमधील रस्ते, लाईट चे पोल व गटर करणेकामी तसेच इंदिरा हौसिंग सोसायटी, इरगोंडा पाटील नगर, देवगोंडा पाटील नगर, अष्टविनायक नगर येथील भागात ड्रेनेज खुदाई काम सुरु आहे व रस्त्यांची अवस्था खराब झाली असलेने वाहतुकीस अडथळा होऊन अपघात होत असलेने विशेष बाब म्हणून सदर वाढीव भागाला तात्काळ निधी मिळणेबाबत श्री. मनोज हिंगमिरे, सदस्य यांनी दि. १०/०३/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेबाबत.

ठराव

कबनुर हद्दीतील इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या वाढीव हद्दीमधील रस्ते, लाईट चे पोल व गटर करणेकामी तसेच इंदिरा हौसिंग सोसायटी, इरगोंडा पाटील नगर, देवगोंडा पाटील नगर, अष्टविनायक नगर तसेच केटकाळे नगर गल्ली नं. १ ते ७ येथील भागात ड्रेनेज खुदाई काम सुरु आहे व रस्त्यांची अवस्था खराब झाली असलेने वाहतुकीस अडथळा होऊन अपघात होत असलेने विशेष बाब म्हणून सदर वाढीव भागाला तात्काळ निधी मिळणेबाबत श्री. मनोज हिंगमिरे, सदस्य यांनी दि. १०/०३/२०२६ चे पत्रानुसार मागणी केली आहे.

तरी मा. सदस्य यांचे मागणीनुसार इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट झालेल्या वरील प्रमाणे नमुद भागासाठी विशेष बाब म्हणून निधी मिळणेसाठीचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेत यावा.

सूचक : नि. कि. पोवार

अनुमोदक : सु. बा. कळगते

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

ठराव क्र. ३२
दि. २५/०३/२०२६

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

विषय क्र. १३ : कबनुर हद्दीतील इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या वाढीव हद्दीमधील रस्ते, लाईट चे पोल व गटर करणेकामी तसेच इंदिरा हौसिंग सोसायटी, इरगोंडा पाटील नगर, देवगोंडा पाटील नगर, अष्टविनायक नगर येथील भागात ड्रेनेज खुदाई काम सुरु आहे व रस्त्यांची अवस्था खराब झाली असलेने वाहतुकीस अडथळा होऊन अपघात होत असलेने विशेष बाब म्हणून सदर वाढीव भागाला तात्काळ निधी मिळणेबाबत श्री. मनोज हिंगमिरे, सदस्य यांनी दि. १०/०३/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेबाबत.

ठराव

कबनुर हद्दीतील इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या वाढीव हद्दीमधील रस्ते, लाईट चे पोल व गटर करणेकामी तसेच इंदिरा हौसिंग सोसायटी, इरगोंडा पाटील नगर, देवगोंडा पाटील नगर, अष्टविनायक नगर तसेच केटकाळे नगर गल्ली नं. १ ते ७ येथील भागात ड्रेनेज खुदाई काम सुरु आहे व रस्त्यांची अवस्था खराब झाली असलेने वाहतुकीस अडथळा होऊन अपघात होत असलेने विशेष बाब म्हणून सदर वाढीव भागाला तात्काळ निधी मिळणेबाबत श्री. मनोज हिंगमिरे, सदस्य यांनी दि. १०/०३/२०२६ चे पत्रानुसार मागणी केली आहे.

तरी मा. सदस्य यांचे मागणीनुसार इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट झालेल्या वरील प्रमाणे नमुद भागासाठी विशेष बाब म्हणून निधी मिळणेसाठीचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेत यावा.

सूचक : नि. कि. पोवार

अनुमोदक : कु. बा. कळागते

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ३३
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. १४ : इचलकरंजी महानगरपालिका अग्निशमन केंद्रांची सध्याची परिस्थिती, इचलकरंजी शहराची सध्याची लोकसंख्या व वाढीव लोकसंख्या लक्षात घेता अग्निशमन केंद्रांची आवश्यकता यासह अग्निशमन विभागाकडील आस्थापना इ. बाबत मा. उदयसिंग मारुती पाटील, विरोधीपक्षनेता यांनी मा. महासभेमध्ये माहिती देणेची मागणी केली आहे. सदर बाबत कार्यालयाने सादर केलेली माहिती मा. महासभेमध्ये जाहीर करणेबाबत.

ठराव

मा.विरोधी पक्ष नेते श्री.उदयसिंग राजश्री मारुती पाटील यांनी दि. ०४/०३/२०२६ रोजीचे पत्रानुसार इचलकरंजी महानगरपालिका अग्निशमन केंद्रांची सध्याची परिस्थिती, इचलकरंजी शहराची सध्याची लोकसंख्या व वाढीव लोकसंख्या लक्षात घेता अग्निशमन केंद्रांची आवश्यकता यासह अग्निशमन विभागाकडील आस्थापना इ. बाबत माहिती मा. महासभेमध्ये देणेची मागणी केली आहे.

मा. उदयसिंग पाटील यांनी मागणी केले प्रमाणे कार्यालयाने खालील प्रमाणे दिलेली माहिती मा. महासभेमध्ये जाहीर करणेत आली

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td>(१)</td><td>अग्निशमन केंद्रांची संख्या किती आहे</td><td>दोन</td></tr>
<tr><td>(२)</td><td>लोकसंखेच्या व वाढत्या उद्योग व्यवसायाच्या अनुषंगाने आणखीन किती अग्निशमन केंद्रे असावीत ?</td><td>Standing Fire Advisory Council यांच्या शिफारसीनुसार साधारणपणे प्रत्येक १० चौ.कि.मी. क्षेत्रासाठी ०१ अग्निशमन केंद्र असणे आवश्यक आहे. इचलकरंजी महानगरपालिकेचे क्षेत्रफळ सुमारे २९.८४ चौ.कि.मी. असल्याने त्या प्रमाणात शहरासाठी ०३ अग्निशमन केंद्रे आवश्यक ठरतात. त्यामुळे सध्या शहरासाठी ०१ अतिरिक्त अग्निशमन केंद्राची आवश्यकता आहे.</td></tr>
<tr><td>(३)</td><td>आग विझवणारे गाड्या किती आहेत ?</td><td>दोन</td></tr>
<tr><td>(४)</td><td>किती गाड्यांची आवश्यकता आहे ?</td><td>Standing Fire Advisory Council यांच्या शिफारसीनुसार सुमारे ५०,००० लोकसंखेसाठी एक अग्निशमन वाहन आवश्यक आहे. त्यानुसार अजून चार अग्निशमन वाहनांची आवश्यकता आहे.
त्यापैकी एक अग्निशमन वाहन खरेदीकामी जा.क्र.अग्नि/४२६/२०२५ दि. १९-०९-२०२५ नुसार कार्यादेश देण्यात आलेला आहे व शासनाकडून एक अग्निशमन वाहन मिळणार आहे. तसेच महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिकेस अग्निशमन वाहनासाठी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून त्याची निविदा प्रक्रिया चालू आहे.</td></tr>
<tr><td>(५)</td><td>अग्निशमन विभाग आस्थापना पदे मंजूर किती?</td><td rowspan="2"><table>
<tr><th>अ.क्र.</th><th>पदनाम</th><th>मंजुर पदसंख्या</th><th>कार्यरत</th><th>रिक्त</th></tr>
<tr><td>१</td><td>मुख्य अग्निशमन अधिकारी</td><td>१</td><td>०</td><td>१</td></tr>
<tr><td>२</td><td>सहा. अग्निशमन अधिकारी</td><td>१</td><td>०</td><td>१</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>(६)</td><td>किती कर्मचारी वर्ग आज उपलब्ध आहे?</td></tr>
</table>

३	अग्निशमन केंद्र अधिकारी	२	१	१
४	प्रमुख अग्निशमन विमोचक (लिडिंग फायरमन)	६	६	०
५	वाहन चालक कम ऑपरेटर (यंत्रचालक)	१३	०	१३
६	अग्निशमन विमोचक	४२	२	४०
७	शिपाई	१	०	१
	एकुण	६६	९	५७

सूचक : नि. कि. पोवार

अनुमोदक : सु. बी. कलागते.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४ ठराव क्र. ३४
सर्वसाधारण सभा दि. २५/०३/२०२६

विषय क्र. १५ : इचलकरंजी शहरामध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या लक्षणीय वाढली असलेने व सदरची भटकी कुत्री नागरीकांवर हल्ला करीत असलेने सदरची भटकी कुत्री पकडुन त्यांच्यावर करणेत येत असलेल्या नसबंदी बाबतची कार्यवाही व सध्य स्थिती याबाबतचा अहवाल मा. महासभेसमोर सादर करणेबाबत.

ठराव

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या जास्त असलेमुळे सदरची कुत्री नागरिकांना व लहान मुलांना त्रास देत असलेबाबत इकडे तक्रारी प्राप्त होत असलेमुळे शहरातील सर्व भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण (नसबंदी) व अँटी रेबीज लसीकरण करणेकामी मा.प्र. अधिकारी तथा प्रशासक यांचे दि:- २२/०६/२०२३ रोजीच्या मान्यतेने इकडील जा.क्र.इ.म.न.पा./आरोग्य/१६४६/२०२३ दि. २८/११/२०२३ ने जेनिस स्मिथ ॲनिमल वेलफेअर ट्रस्ट पाचगणी यांना १५०० भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करणेचे काम मंजूर करणेत आले होते.

१. जेनिस स्मिथ ॲनिमल वेलफेअर ट्रस्ट पाचगणी यांन
जा.क्र.इ.म.न.पा./आरोग्य/२८४/१/२०२४ दि.०६/०८/२०२४ ने १५०० भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करणेचे कामास मुदतवाढ देणेत आली.

२. जेनिस स्मिथ ॲनिमल वेलफेअर ट्रस्ट पाचगणी यांना जा.क्र.इ.म.न.पा./आरोग्य/८४/२०२५ दि.२१/०१/२०२५ ने १५०० भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करणेचे कामास मुदतवाढ देणेत आली.

३. जेनिस स्मिथ ॲनिमल वेलफेअर ट्रस्ट पाचगणी यांना जा.क्र.इ.म.न.पा./आरोग्य/७०२/२०२५ दि.०७/०८/२०२५ ने पुढील निविदा पूर्ण होई तोपर्यंत जेवढे निर्बीजीकरण होईल तेवढेच बिल अदा करणेच्या मर्यादेत मुदतवाढ देणेत आलेली आहे.

मक्तेदार जेनिस स्मिथ ॲनिमल वेलफेअर ट्रस्ट पाचगणी यांनी प्रत्यक्ष कामास दि.२९/१२/२०२३ रोजी सुरु करून वेळोवेळी मुदतवाढ देणेत आले असलेने त्यांनी आज अखेर ३७९९ नर व ४८७४ मादी असे एकूण ८६७३ भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करणेचे काम पूर्ण केलेले आहे. सदरचे काम मक्तेदार यांनी दैनंदिन सरासरी १५ ते २० भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करणेचे काम केलेले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या SUO MOTO WRIT PETTION (CIVIL) NO (S).५ OF २०२५ व प्राणी जन्म नियंत्रण (ABC) नियम, २०२३ दि.१० मार्च, २०२३ मधील तरतुदीचे अनुपालन करणेकामी प्राणी जन्म नियंत्रण (ABC) नियम, २०२३ नुसार भटक्या कुत्र्यांना पकडणे, त्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करणे, त्यांच्यासाठी शेल्टर (निवारा) तयार करणे आणि इतर आवश्यक बाबींचे विहित मुदतीमध्ये अनुपालन करणे कामी जागा मागणी करून शेल्टर (निवारा) तयार करणेबाबत मागणी केली असलेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

वरील प्रमाणे कार्यालयीन प्रस्ताव अवलोकनी येवून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या SUO MOTO WRIT PETTION (CIVIL) NO (S).५ OF २०२५ व प्राणी जन्म नियंत्रण (ABC) नियम, २०२३ दि.१० मार्च, २०२३ मधील तरतुदीनुसार भटक्या कुत्र्यांचे लसीकरण व निर्बिजीकरण करणेबाबतची कार्यवाही प्रभावीपणे करणेत यावी. तसेच भटक्या कुत्र्यांसाठी शेल्टर (निवारा) तयार करणेसाठी आवश्यक जागा इचलकरंजी महानगरपालिकेच्या कचरा डेपो येथील M.S.W. प्रोसेसिंग शेडच्या अग्नेयेकडील सात गुंठे जागा भटक्या कुत्र्यांचे निवारा केंद्र व निर्बिजीकरण व लसीकरण केंद्रासाठी उपलब्ध करुन देणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : वि. पु.-चोपडे.

अनुमोदक : A.P. Bachate सौ. अ.प्र. बचाटे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

ठराव क्र. ३५
दि. २५/०३/२०२६

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

विषय क्र. १६ : महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान अंतर्गत इचलकरंजी शहरातील अस्तित्वातील भुयारी गटार योजना बळकटीकरण व वाढीव भागांमध्ये भुयारी गटार जाळे तयार करणेकामी आता पर्यंत किती काम पुर्ण झाले आहे, किती बिल अदा करणेत आले आहे, किती काम शिल्लक आहे, कामीची मुदत किती आहे व सदर योजनेकामी स्वहिस्सा किती आहे व तो कसा उपलब्ध करुन देणेत येणार आहे याबाबतची माहिती मा. महासभेसमोर देणेबाबत मा. उदयसिंग मा. पाटील, विरोधीपक्षनेता व संजय शं. तेलनाडे, सदस्य यांनी मागणी केलेबाबत.

ठराव

मा.विरोधी पक्ष नेते श्री.उदयसिंग राजश्री मारुती पाटील यांनी दि. २४/०२/२०२६ रोजीचे पत्रानुसार महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान अंतर्गत इचलकरंजी शहरातील अस्तित्वातील भुयारी गटार योजना बळकटीकरण व वाढीव भागांमध्ये भुयारी गटार जाळे तयार करणेकामी आता पर्यंत किती काम पुर्ण झाले आहे, किती बिल अदा करणेत आले आहे, किती काम शिल्लक आहे, कामीची मुदत किती आहे व सदर योजनेकामी स्वहिस्सा किती आहे व तो कसा उपलब्ध करुन देणेत येणार आहे इ. बाबत माहिती मा. महासभेमध्ये देणेची मागणी केली आहे.

मा. उदयसिंग पाटील यांनी मागणी केले प्रमाणे कार्यालयाने खालील प्रमाणे दिलेली माहिती मा. महासभेमध्ये जाहीर करणेत आली.

विषयांकितकामी मा. श्री. उदयसिंग मारुती पाटील, विरोधी पक्ष नेता, इ.म.पा. व इतर सन्माननीय सदस्य यांनी दि. २४/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये नगरोत्थान महाभियांन अंतर्गत भुयारी गटार योजनाचे सुरु असले कामाबाबत महासभेसमोर विषय आणणेकामी सुचित केले आहे. त्यानुसार या विषयाबाबतची माहिती खालीलप्रमाणे,

योजनेचे नाव: नगरोत्थान महाभियान सन २०२४-२०२५

कामाचे नाव: इचलकरंजी शहर मलनि:स्सारण प्रकल्प इचलकरंजी शहरातील अस्तित्वातील भुयारी गटर योजनेचे बळकटीकरण करणे व नव्याने विकसित झालेल्या भागामध्ये भुयारी गटार योजना कार्यान्वित करणे.

प्रशासकिय मान्यता: दि. ०३/०७/२०२४ सुधारित प्रशासकीय मान्यता राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समिती बैठक, दि. २९/०८/२०२५

मंजूर रक्कम : ५१९.९७ कोटी

वित्तीय आकृतीबंध

एकूण मंजूर रक्कम रु. ५१९.९७ कोटी
राज्यशासन अनुदान रु. ३४२.०७ कोटी
मनपा स्वहिस्सा रु. १४६.६० ३१.३० १७७.९० कोटी

कामाचा संक्षिप्त तपशिल

वित्तीय तपशिल

अ.क्र.	तपशिल	मंजूर रक्कम रूपये
१	मुळ कामाची रक्कम	४३२,६५,१८,०८२.८७/-
२	जी.एस.टी. १८ %	७७,८७,७३,२५४.१२/-
३	1% TS Charges	४.३२.६५.१८०.८३/-
४	PDW चार्जेस	१.२३.२९.९३९.८८/-
५	प्रकाल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क (०.७६%)	३,८८,००,२१४.१७/-
	एकूण	५१९.९६.८६.६७२.६५/-
	Say	५१९.९७ कोटी

भौतिक तपशिल

प्रमुख उपांगे

१. शहरातील एकुण संकलन झोन संख्या: ०३

२. मलशुध्दीकरण केंद्र :

I. जुना चंदुर रोड येथे १३ ML.D मलशुध्दीकरण केंद्र उभारणे,

II. टाकवडे वेस येथे १९ ML.D मलशुध्दीकरण केंद्र उभारणे,

कार्यारंभ आदेश : दि. १०/१२/२०२४

कामाचा कालावधी : २४ महिने

कामाचे मक्तेदार : एल.सी. इन्का. प्रोजेक्ट प्रा.लि. गुजरात

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नाव : यश कन्सलटंन्सी प्रा.लि. मुंबई.

कामाचा तपशिल

अ.क्र.	कामाचे स्वरुप	तपशिल	कामाची सद्यस्थिती
१	मलशुध्दीकरण केंद्र १९.५ द.ल.लि	बौध्द विहार टाकवडे वेस येथे असणा-या १८ द.ल.लि क्षमतेच्या मलशुध्दीकरण केंद्रालगत उपलब्ध जागे मध्ये	१९.५ द.ल.लि मलशुध्दीकरण केंद्राचे काम सुरु असुन पाईल फ़ाऊंडेशन, कॅपिंग, ग्राऊंड बिम चे काम पुर्ण झाले आहे. HFL पर्यंतचे कॉलम उभारणेचे काम सुरु आहे.
२	०२ मलशुध्दीकरण केंद्र १३.० द.ल.लि	चंदुर रोड, चंदुर ओढ्यालगत अधिग्रहित करण्यात आलेल्या जागे मध्ये	नकाशे व आराखडे मंजुरी साठी वालचंद कॉलेज ऑफ़ इंजिनिअरिंग, सांगली यांचे कडे दाखल केले आहेत.
३	भुयारी गटार जाळे झोन - i	एकूण भुयारी गटार जाळे ५९.२१३ कि.मी	९.२११ कि.मी भुयारी गटारीचे जाळे पूर्ण
४	भुयारी गटार जाळे झान - ii	एकूण भुयारी गटार जाळे १४१.८०४ कि.मी	४.९५० कि. मी भुयारी गटारीचे जाळे पुर्ण
५	भुयारी गटार जाळे झान - iii	एकुण भुयारी गटार जाळे १२६.६४७कि.मी	२९.३७२ कि.मी भुयारी गटारीचे जाळे पूर्ण

आज अखेर देण्यात आलेल्या देवकाचा तपशिल -

एकुण दोन धावती देयके देण्यात आली असून रक्कम रु. ३१.२२ कोटी इतके देयक अदा करणेत आले आहे.

स्वहिस्सा तरतुद -

याकामीचा स्वहिस्सा हा र.रु. १७७.९० कोटी इतका असुन महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थिती विचारात घेता नागरी भागासाठी पायाभूत सुविधा विकास निधी (UIDF) योजनेच्या अंतर्गत र.रु. १०० कोटी इतक्या कांची उभारणी करणेत आलेली आहे. उर्वरीत निधी म.न.पा. कडे प्राप्त होणा-या विविध निधी मधुन करणेत येणार आहे तसेच याकामी स्वहिस्साची सर्व रक्कम शासनामार्फत भरणेत यावी याकरीता वित्त विभागाकडे पत्रव्यवहार करणेत आलेला आहे.

सूचक : स्व.बा. कलगते

अनुमोदक : नि.कि. पोवार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ३६
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. १७ : आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२५-२६ व सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत निधीमधुन इचलकरंजी शहरामध्ये खुदाई करणेत आलेल्या कुपनलीकांमध्ये पंप – पोल व पेटी - इलेक्ट्रीक कनेक्शन याकामी माहिती देणेबाबत मा. उदयसिंग मा. पाटील, विरोधीपक्षनेता यांनी दि. २४/०२/२०२६ चे पत्रानुसार मा. महासभेमध्ये माहिती देणेची मागणी केलेबाबत.

ठराव

मा.विरोधी पक्ष नेते श्री.उदयसिंग राजश्री मारुती पाटील यांनी दि. २४/०२/२०२६ रोजीचे पत्रानुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२५-२६ व सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत निधीमधुन इचलकरंजी शहरामध्ये खुदाई करणेत आलेल्या कुपनलीकांमध्ये पंप – पोल व पेटी - इलेक्ट्रीक कनेक्शन याकामी माहिती देणेबाबत इ. बाबत माहिती मा. महासभेमध्ये देणेची मागणी केली आहे.

मा. उदयसिंग पाटील यांनी मागणी केले प्रमाणे कार्यालयाने खालील प्रमाणे दिलेली माहिती मा. महासभेमध्ये जाहीर करणेत आली.

काम क्रमांक - ०१

- **योजनेचे नाव :** आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२५-२६ अंतर्गत
- **कामाचे नाव :** इचलकरंजी महानगरपालिका हददीतील एकुण १०७ ठिकाणी विंधन विहीरींवर विदयुत मोटार बसविणे व तदअनुषंगिक कामे करणे.
- **प्रशासकिय मान्यता :** दि. १३/१२/२०२५ (जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापुर) (यामध्ये ६५ ठिकाणी आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२५-२६ अंतर्गत व ४२ ठिकाणी अनुसुचित जाती जमाती राखीव निधीतुन मंजुर)
- **मंजूर रक्कम :** र.रु. १,४९,१३,६३६/-
- **मा. प्रशासक ठराव क्र. ७०/२०२६** (मा. स्थायी) दि. १९/०१/२०२६
- **कार्यारंभ आदेश :** दि. १९/०१/२०२६
- **काम पुर्ण करणेचा आवधी :** ३ महिने
- **दोष दायित्व कालावधी :** १ वर्ष
- **कामाचे मक्तेदार :** तुषार इलेक्ट्रीक्लस, इचलकरंजी

कामाचा तपशिल

इचलकरंजी महानगरपालिका हददीतील एकुण १०७ ठिकाणी विंधन विहीरींवर विदयुत मोटार बसविणे व तदअनुषंगिक कामे करणे. (आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२५-२६ अंतर्गत) कामी विहीत मुदतीत निविदा प्रक्रिया करणेअंती मा. प्रशासक ठराव क्र. ७०/२०२२६ (मा. स्थायी) दि. १९/०१/२०२६ अन्वये कामाचे सर्वात कमीचे प्राप्त निविदा धारक तुषार इलेक्ट्रीक्लस यांना उक्तकाम मंजुर करणेत आले असुन दि. १९/०१/२०२६ रोजी कार्यारंभ आदेश देणेत आलेला आहे.

यानुसार सदर मक्तेदार यांनी मंजुर कामामधील एकुण ८७ ठिकाणी विदयुत मोटर बसविलेली आहे. उर्वरीत २० ठिकाणी विदयुत मोटार बसविणे व १०७ ठिकाणी पोल पेटी बसविणेचे काम प्रगती पथावर सुरु आहे. सध्यस्थितीत कोणत्याही ठिकाणी महावितरण व्यवस्थेकडुन विदयुत कनेक्शन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

काम क्रमांक - ०२

- **योजनेचे नाव :** आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२५-२६ अंतर्गत
- **कामाचे नाव :** इचलकरंजी महानगरपालिका हददीतील एकुण १०० ठिकाणी विंधन विहीरींवर विदयुत मोटार बसविणे व तदअनुषंगिक कामे करणे.
- **प्रशासकिय मान्यता :** दि. १०/१२/२०२५ (जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापुर) (यामध्ये ७८ ठिकाणी आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२५-२६ अंतर्गत व २२ ठिकाणी अनुसुचित जाती जमाती राखीव निधीतुन मंजुर)
- **मंजूर रक्कम :** र.रु. १,३९,३७,९७८/-

- **मा. प्रशासक ठराव क्र. ६९/२०२६** (मा. स्थायी) दि. १९/०१/२०२६
- **कार्यारंभ आदेश** : दि. १९/०१/२०२६
- **काम पुर्ण करणेचा आवधी** : ३ महिने
- **दोष दायित्व कालावधी** : १ वर्ष
- **कामाचे मक्तेदार** : तुषार इलेक्ट्रीक्लस, इचलकरंजी

कामाचा तपशिल,

इचलकरंजी महानगरपालिका हददीतील एकुण १०० ठिकाणी विंधन विहीरींवर विदयुत मोटार बसविणे व तदअनुषंगिक कामे करणे. (आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२५-२६ अंतर्गत) कामी विहीत मुदतीत निविदा प्रक्रिया करणेअंती मा. प्रशासक ठराव क्र. ६९/२०२२६ (मा. स्थायी) दि. १९/०१/२०२६ अन्वये कामाचे सर्वात कमीचे प्राप्त निविदा धारक तुषार इलेक्ट्रीक्लस यांना उक्तकाम मंजुर करणेत आले असुन दि. १९/०१/२०२६ रोजी कार्यारंभ आदेश देणेत आलेला आहे.

यानुसार सदर मक्तेदार यांनी मंजुर कामामधील एकुण ८५ ठिकाणी विदयुत मोटर बसविलेली आहे. उर्वरीत १५ ठिकाणी विदयुत मोटार बसविणे व १०० ठिकाणी पोल पेटी बसविणेचे काम प्रगती पथावर सुरु आहे. सध्यस्थितीत कोणत्याही ठिकाणी महावितरण व्यवस्थेकडुन विदयुत कनेक्शन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

सूचक : सु. बा. कलगते

अनुमोदक : नि. कि. पोवार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १८
दि. २५/०३/२०२६

अभिनंदनाचा ठराव

विषय- राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये श्रेणिक दलवाईने मिळवले रौप्य पदक

महाराष्ट्र राज्य रायफल असोसिएशन च्या मान्यतेने ३ व ४ मार्च रोजी डेरवण येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय डेरवण युथ गेम्स २०२६ या खुल्या नेमबाजी स्पर्धेमध्ये श्रेणिक सदानंद दलवाई याने दहा मीटर एयर पिस्टल या प्रकारात १७ वर्ष वयोगटामध्ये ४०० पैकी ३७१ एवढे गुण प्राप्त करून रौप्य पदक मिळवून अकॅडमीचे नावलौकिक केले त्याला आई ध्रुवती दलवाई व वडील सदानंद दलवाई यांचे सहकार्य लाभत आहे... तसेच या स्पर्धेमध्ये तृप्ती चौगुले, सृष्टी खटाळे, यशश्री परमाज, मौर्य हुवाळे, समर्थ कांबळे. आणि मुस्कान मुलांणी यांनीही कौतुकास्पद कामगिरी केली.. हे सर्वजण सध्या गांधीनगर निगडेवाडी येथील ड्रीम ओलंपियन शूटिंग अकॅडमी येथे सराव करत असून त्यांना आंतरराष्ट्रीय नेमबाज अनुराधा खूडे व समीर मुल्लानी यांचे मार्गदर्शन लाभत असून पालकांचे प्रोत्साहन लाभत आहे .

आपल्या सर्व इचलकरंजीच्या दृष्टीने हि आनंदाची आणि अभिमानाची घटना आहे. आजच्या महासभेच्या वतीने अभिनंदनाचा ठराव करणेत येत आहे.

सूचक- श्री. ते. अ. भोजने

श्री. अ. अ. बोमी.

अनुमोदक-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. २०
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. १ : मागील सभा दि. २०/०२/२०२६, ०२/०३/२०२६, ०९/०३/२०२६ इ. रोजी झालेल्या मा. महासभांचे इतिवृत्त कायम करणे.

ठराव

मागील सभा दि. २०/०२/२०२६, ०२/०३/२०२६, ०९/०३/२०२६ इ. रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त प्र. नगरसचिव यांनी सभेसमोर वाचुन दाखवले ते योग्य व बरोबर असलेने कायम करणेत येत आहे.

सूचक : सु. बा. कबनगते.

अनुमोदक : सौ. स. प्र. मिटके.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
विशेष सभा

ठराव क्र. २१
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. २ : इचलकरंजी महानगरपालिका विशेष समित्यांचे अधिकार क्षेत्र निश्चित करणेस तसेच महासभेकडुन विशेष समित्यांना अधिकार व कर्तव्ये प्रत्यायोजीत करणेबाबत.

ठराव

इचलकरंजी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक झाली असुन, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती, शिक्षण समिती व मागासवर्गीय कल्याण समिती या विशेष समित्या गठीत करणेत आल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० पोटकलम (२) नुसार महानगरपालिकेस तिच्या सभेत उपस्थित असलेल्या व मत देणाऱ्या पालिका सदस्यांपैकी कमीत कमी दोन तृतीयांश पालिका सदस्यांनी मत देवून पारित केलेल्या विशिष्ठ ठरावाद्वारे प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित करता येईल आणि अशा कोणत्याही क्षेत्रात समाविष्ट केलेल्या सर्व बाबी व प्रश्न प्रथमत: समुचीत समितीपुढे ठेवले पाहिजेत व ते अशा समितीच्या शिफारशीसह महानगरपालिकेस सादर केले पाहिजे असा निदेश देता येईल, तसेच महानगरपालिकेस, तशाच ठरावाद्वारे आपले अधिकार व कर्तव्ये यापैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये सदर विशेष समित्यांकडे प्रत्यायोजीत करता येतील अशी तरतुद आहे.

इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये महिला व बालकल्याण समिती, शिक्षण समिती व मागासवर्गीय कल्याण समिती या विशेष समित्या गठीत करणेत आलेल्या आहेत. अधिनियमातील तरतुदीनुसार सदर विशेष समित्यांचे क्षेत्र निश्चित करणेकामी मा. महासभेमध्ये निर्णय होणेसाठी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

त्यानुसार,

परिवहन - अधिनियमातील तरतुदी व वाहन विभाग वाहने खरेदी / विक्री, देखभाल दुरुस्ती, नियंत्रण.

शिक्षण - म.न.पा. प्राथमिक शाळा शिक्षक व विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी दुर करणे, शिक्षण प्रसारासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देणे. शालेय विद्यार्थी व क्रिडा विभागाकडील क्रिडांगणे व व्यायामशाळा यांचे नियंत्रण, क्रिडा स्पर्धा आयोजीत करणे, क्रिडा साहित्य उपलब्ध करुन देणे.

मागासवर्गीय समिती - महसुली उत्पन्नातुन बांधील खर्च वजा जाता राहणाऱ्या उत्पन्नातील ५ % रक्कम मागासवर्गीय (SC / ST / NT) वर्गाचे उन्नतीसाठी खर्च करणेसाठीची आवश्यक कामे करणे, याबाबतची शिफारस स्थायी समिती /महापालिकेकडे करणे.

महिला व बालकल्याण समिती - शासन निर्णयाप्रमाणे योजना राबवणे.

प्रभाग समिती – महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (७) नुसार नेमुण देणेत आलेली कामे.

इचलकरंजी महानगरपालिकेच्या वरील प्रमाणे विशेष समित्यां व प्रभाग समिती मार्फत तयार करणेत आलेले प्रस्ताव हे सदर विशेष समित्यांच्या व प्रभाग समित्यांच्या शिफारशीसह योग्य त्या प्राधिकरणाकडे मंजुरीसाठी सादर करणेत यावेत.

सूचक : विक्रम पुंडलिक चोपडे

अनुमोदक : A.P. Bobale सौ. अरुणा प्रमोद जाधव

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. २२
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. ३ : इचलकरंजी महानगरपालिकेचे मा. महापौर, सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व मा. सदस्य यांना मानधन / भत्ते देणेस तसेच सभासदांना सभेस उपस्थित असलेबाबतचा भत्ता अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

ठराव

इचलकरंजी महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक होवून महानगरपालिकेचे महापौर, उपमहापौर, सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता यांची नियुक्ती झाली आहे. यासोबतच सर्व सभासदांना सभा भत्ता देणेबाबतचा कार्यालयीन प्रस्ताव वाचून दाखविनेत आला.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १९ अ (१) नुसार राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने महानगरपालिकेस या कलमामुळे, महानगरपालिकेने केलेल्या नियमांद्वारे विहित करणेत येईल असे मानधन, फी किंवा अन्य भत्ते प्रत्येक पालिका सदस्याला देता येतील.

शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र १२८/नवि २० दि. १५ जुलै २०१७ नुसार महानगरपालिकेतील सदस्यांचे मानधन (दुरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल या बाबींवरील खर्च लक्षात घेवून) ड वर्ग महापालिकेसाठी मासिक मानधन रु. १०,०००/- निश्चित करणेत आले आहे. यानुसार आपले महापालिकेचे सर्व सदस्यांना मासीक रु १०,००० /- भत्ता देणेत यावा.

कलम १९ अ (१) नुसार महानगरपालिकेने राज्य शासन वेळोवेळी आदेशाद्वारे निर्धारित करेल एवढी रक्कम दरवर्षी आतिथ्य भत्ता म्हणून महापौरांकडे सुपुर्द केली पाहिजे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एम एम सी- १२९७/८५५/प्र.क्र. ६३/नवि २४ दि. ०२ जुन २००१ नुसार खालील प्रमाणे प्रतीवर्षी आतिथ्य भत्ता उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत आली आहे.

महानगरपालिकांचे वार्षिक उत्पन्न	अनुज्ञेय आतिथ्य भत्ता
१०० कोटी पर्यंत	६०,०००/-
१०१ ते ४०० कोटी	९०,०००/-
४०१ ते १००० कोटी	१,००,०००/-
१००१ कोटी च्या वर	२,००,०००/-

आपले महापालिकेचे आर्थीक उत्पन्न १०१ ते ४०० कोटी असलेने महानगरपालिकेचे महापौरांना वार्षीक रु. ९०,०००/- इतका अतित्थ भत्ता देणेत यावा.

कलम १९ एक अ (२) नुसार सभागृह नेता यांना मानधन, भत्ते व इतर सुविधा देण्याबाबत महानगरपालिकेने केलेल्या विनियमाद्वारे तरतुद केल्यानुसार मानधन भत्ते व इतर सुविधा देण्यात येतील.

कलम १९ एक अ अ (२) नुसार विरोधी पक्ष नेता यांना मानधन, भत्ते व इतर सुविधा देण्याबाबत महानगरपालिकेने केलेल्या विनियमाद्वारे तरतुद केल्यानुसार मानधन भत्ते व इतर सुविधा देण्यात येतील.

सदर तरतुदीनुसार इचलकरंजी महानगरपालिकेचे सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता यांना महापालिकामध्ये स्वतंत्र दालन लिपिक शिपाई यांची व्यवस्था करण्यात यावी यांचे साठी प्रत्येकी स्वतंत्र वाहन व्यवस्था महापालिकेकडून करण्यात यावी त्यांना प्रत्येकी वार्षिक ३० हजार रुपये अतिथ्य भत्ता देण्यात यावा

सभेचा भत्ता-

शासन निर्णय नगरविकास विभाग क्र. संकिर्ण- २००४/४६८/प्र.क्र. ८४/०४ नवि २० दि. २४ जानेवारी २००५ नुसार महानगरपालिका सभेसाठी उपस्थित राहणाऱ्या सभादांना खालील प्रमाणे सभेचा भत्ता देय आहे.

एक दिवसासाठी सभेला / सभांना हजर असलेल्या पालिका सदस्यांना रु. १००/- इतका असेल (रु. १००.०० प्रति दिवस). परंतु अशा सभेला गणपूर्ती असावी आणि सभेचे कामकाज झालेले असणे आवश्यक आहे.

अनेक वेळा एकाच दिवशी एकापेक्षा जास्त सभा होतात. उदाहरणार्थ सकाळी १०.३० वाजता स्थायी समिती सभा व सायंकाळी ४.३० वाजता सर्वसाधारण सभांचे आयोजन होऊन दोन्ही सभा संपन्न झाल्या व सभेत कामकाज झालेले असले तरी

त्या दिवसासाठी फक्त रु. १००/- इतकाच सभा भत्ता देय होईल. सभा भत्ता एका दिवसात सभेला हजर असल्याबद्दल आहे. मग एक सभा असो की एकापेक्षा जास्त सभा असोत. सभा भत्ता एक दिवसासाठीच देय होईल.

सभा भत्ता हा महानगरपालिकेची विशेष सभा, मासिक सभा, तहकूब सभा, स्थायी समिती सभा, विशेष समिती सभांसाठी उपस्थित सदस्यांसाठीच देय राहील. तहकूब सभांच्या बाबतीत गणपूर्तीची आवश्यकता नाही. अशा परिस्थितीत सभा भत्ता देय होईल परंतु सभेत कामकाज होणे आवश्यक आहे. सभा भत्त्यांची रक्कम अग्रीम स्वरूपात देय होणार नाही.

सभा भत्ता एक महिन्यासाठी जास्तीत जास्त रु. ४००/- इतका असेल एखाद्या महिन्यात ४ दिवसांपेक्षा जास्त दिवस सभा झाल्यास सभा भत्त्याची कमाल मर्यादा रु. ४००/- इतकी आहे. शासन निर्णयाप्रमाणे इचलकरंजी महापालिकेच्या सदस्यांना सभा भत्ता देणेत यावा.

सूचक : नि. कि. पोवार

अनुमोदक : सु. बा. कणगले.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
विशेष सभा

ठराव क्र. २४
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. ५ : पंचगंगा नदीस येणारे संभाव्य महापुर काळात करणेत येणारे उपाययोजना बाबत मा. महासभेमध्ये चर्चा करुन निर्णय घेणेबाबत.

ठराव

इचलकरंजी शहरात प्रतीवर्षी पुराचा धोका संभवत आहे. इचलकरंजी शहरामध्ये पंचगंगा नदीची पाण्याची पातळी वाढल्याने सन २०१९,२०२१,२०२४ साली महापुर आलेला होता. नदीमध्ये पाण्याची पातळी वाढल्यानंतर शहरामधून वाहणारे दोन मुख्य काळा ओढा व चंदूर ओढ्यात पाण्याचा निचरा न झालेस ओढ्यातील पाणी नागरी वस्तीमध्ये पसरते इचलकरंजी शहरात पुराचा धोका निर्माण होणेसाठी अतिवृष्टि, कृष्णा नदीचा पुर, अलमट्टी धरण इ. अनेक कारणे आहेत.

तसेच नुकताच यशोदा पुल याठिकाणी नविन पुलाचे बांधकाम करणेत आलेले आहे. वरीलठिकाणी ओढ्याचे पात्रामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ जमा झालेला आहे. नदीत व ओढ्यामध्ये मोठ्या प्रमाणात केंदाळ वनस्पती वाढली आहे. नविन पूल बांधलेल्या ठिकाणी देखील राडारोडा पडला आहे. त्यामुळे पात्राची ऊंची कमी होऊन पाणी वहाण्याची क्षमता कमी झाली आहे. त्यामुळे पाण्याचा निचरा न होता पुराचे पाणी शहरामध्ये पसरण्याची शक्यता वाढते. तसेच पंचगंगा नदीकडे शहरातील मुख्य रस्ता हा मरगुबाई मंदिर ते पंचगंगा नदी घाट पर्यंत रस्ता हा भराव टाकून केला असलेने सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूस पावसाचे पाणी साठत आहे. व त्याचा निचरा होत नाही या कारणास्तव सदर रस्त्याखालून बॉक्स कलव्हर्स्ट तयार केलेस लक्ष्मी दड्डू या परिसरात साचणारे पाणी त्वरित निचरा होणार आहे याकरीता सदर रस्त्याच्या खालून नदिवेस ते पेट्रोलपंप या रस्त्यावर किमान ०४ ठिकाणी कलव्ह उभारणे आवश्यक आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता ओढ्यामधील गाळ काढणे केंदाळ काढणे तसेच यशोदा पुलाजवळील राडारोडा काढणे गरजेचे आहे. जेणेकरून पुरपरिस्थिति आटोक्यात राहील.

वर नमूद केलेल्या कामासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

तात्पुरती उपाययोजना :- शहरातील वर नमूद केलेल्या ठिकाणी गाळ व केंदाळ काढणे.

कायमस्वरूपी उपाययोजना लक्ष्मी दड्डु (४ ठिकाणी) बॉक्स कलवर्ट बांधणे

वरील प्रमाणे कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी कार्यालयीन प्रस्तावानुसार पंचगंगा नदीस येणारा संभाव्य महापुर टाळण्यासाठी तात्पुरत्या उपाययोजने अंतर्गत प्रस्तावात नमुद प्रमाणे गाळ व केंदाळ काढणेस व याकामी येणारे खर्चास मंजुरी देणेत येत आहे व कायम स्वरुपी उपाययोजने अंतर्गत लक्ष्मी दड्डु (४ ठिकाणी) बॉक्स कलवर्ट बांधणेस व याकामी येणारे खर्चास मंजुरी देणेत आहे.

तसेच पंचगंगा नदीस महापुर आल्यास आपत्कालीन व्यवस्थापनाअंतर्गत उपाययोजना करणेसाठी इचलकरंजी महानगरपालिका अतिवृष्टी / पुर आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत करणेत येणाऱ्या उपाययोजना उदा. पुरस्थितीकाळात आपत्कालीन नियंत्रण कक्ष स्थापन करणे, आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे, आपत्कालीन परीस्थीती हाताळणे कामी विविध समित्या गठीत करणे, शहरातील सारण गटार व नाले स्वच्छ करणे, धोकादायक इमारतींचा सर्वे करुन त्यांना नोटीस लागु करणे, पुरग्रस्तांकरीता विविध भागांत पुणर्वसन छावण्या निश्चित करणे व सदर छावण्यांच्या ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करुन देणे, जनावरांसाठी छावण्या तयार करणे व जनावारांसाठी चारा उपलब्ध करुन देणे, पुरग्रस्त भागातील नागरीकांची कौटुंबिक साहित्य पुरग्रस्त छावण्यांच्या ठिकाणी हालविणे, पुरग्रस्तांना जेवण पाणी व नाष्ट्याची सोय करणे, पुरग्रस्तांसाठी केलेला निवारा केंद्र / छावनी च्या ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे, पुरबाधीत क्षेत्रामध्ये फ्लड लाईटची व्यवस्था करणे, धोकादायक पथदीप पोल बदलणे अथवा काढणे, महावितरणशी समन्वय साधुन विद्युत पुरवठा सुरळीत ठेवणेबाबत संपर्कात राहणे, होर्डींग्ज-डिजीटल होर्डींग्ज यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे, धोकादायक वृक्ष व फांद्या तरुसमितीच्या माण्यतेने तोडणे, शहरातील, पुरबाधीत भागातील रस्त्यांवरील खड्डे मुजविने, पुरबाधीत क्षेत्रातील अतिक्रमणे काढणे, मजरेवाडी, पंचगंगा नदीचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे, पुरस्थिती काळात आवश्यक असणारे सर्व औषधे उपलब्ध करणे, सखल भागात पाणी साचल्यास पाण्याचा निचरा करणेसाठी जे.सी.बी. पोकलॅन उपलब्ध करणे, पुर ओसरल्यानंतर पुरग्रस्त भागात जंतुनाशके फवारणी, धुर फवारणी करणे. इ. व पुरपरस्थिती लक्षात घेता तातडीने ज्या त्या वेळी हाती घ्यावी लागणारी सर्व अनुषंगीक कामे हाती घेणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सूचक : विठ्ठल पुंडलिक चोपडे

अनुमोदक : A.P. Bachate सौ. अरुणा प्रमोद बाचाटे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

F. 2628846

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. २५
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. ६ : पंचगंगा नदी प्रदुषण बाबत करावयाच्या उपाययोजना तसेच सायझिंग उद्योगातुन निर्माण होणाऱ्या स्लजच्या शास्त्रोक्त व सुरक्षित व्यवस्थापनासाठी तात्पुरती उपाययोजना करणेसाठी महापालिकेच्या मलशुद्धीकरण केंद्राकडील दोन स्लज ड्रायिंग बेड सायझिंग उद्योगाच्या स्लज व्यवस्थापनासाठी तात्पुरत्या स्वरुपात वापरास मान्यता देणेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

ठराव

वरील विषयास अनुसरून दिनांक ४/०२/२०२६ रोजी मा.अतिरिक्त आयुक्तसो, यांचे दालनात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ,सायझिंग असोसिएशनचे प्रतिनिधी व महानगरपालिकेचे संबंधित विभागांचे अधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली.

सदर बैठीकीमध्ये पंचगंगा नदी प्रदूषणाबाबत करावयाच्या उपाययोजना तसेच सायझिंग उद्योगातून निर्माण होणाऱ्या स्लजच्या शास्त्रोक्त व सुरक्षित व्यवस्थापनासाठी तात्पुरती उपाययोजना म्हणून महानगरपालिकेच्या मलशुद्धीकरण केंद्राकडील दोन स्लज ड्रायिंग बेड वापरण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

वरील बाबीस अनुसरून, पंचगंगा नदी प्रदूषणाबाबत करावयाच्या उपाययोजना तसेच सायझिंग उद्योगातून निर्माण होणाऱ्या स्लजच्या शास्त्रोक्त व सुरक्षित व्यवस्थापनासाठी तात्पुरती उपाययोजना करणेकामी उपलब्ध स्लज ड्रायिंग बेडपैकी दोन स्लज ड्रायिंग बेड सायझिंग उद्योगाच्या स्लज व्यवस्थापनासाठी तात्पुरत्या स्वरूपात वापरणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी , पंचगंगा नदी प्रदूषणाबाबत करावयाच्या उपाययोजना तसेच सायझिंग उद्योगातून निर्माण होणाऱ्या स्लजच्या शास्त्रोक्त व सुरक्षित व्यवस्थापनासाठी तात्पुरती उपाययोजना करणेकामी उपलब्ध स्लज ड्रायिंग बेडपैकी दोन स्लज ड्रायिंग बेड सायझिंग उद्योगाच्या स्लज व्यवस्थापनासाठी एक वर्ष मुदतीकरीता मोफत वापरणेसाठी मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : Shilyar सु. बा. कळगावे

अनुमोदक : Bar नि. कि. पोवार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

2686931

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. २६
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. ७ : महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका हद्दितील प्र.क्र. १२ मुरदंडे मळा येथील गल्ली नं १ येथील रस्त्याचे काम यापुर्वी पुर्ण झाले असलेने गल्ली नं १ या रस्त्याएवजी ए एस सी कॉलेज पश्चिम बाजुकडील चौरासीया घर ते हळदीकर घर / काजवे हॉस्पिटल पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणेबाबत श्री. अजित बाळकृष्ण जाधव (माजी नगरसेवक) यांनी पत्राद्वारे मागणी केले कामी कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्वावाचा विचार करणे.

ठराव

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.12 मध्ये मुरदंडे मळा, गल्ली.नं. १,२ व ३ ही कामे राज्यस्तरीय नगरोत्थान योजना सन - २०२३-२४ मधून मंजूर झालेल्या र.रू.५२ कोटी रक्कमेतून मंजूर आहेत. सदर कामांची कार्यान्वयीन यंत्रणा सार्व.बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन (मा.उपअभियंता) हातकणंगले यांचे कार्यालयामार्फत चालू आहेत. यापैकी गल्ली नं.२ व ३ मधील कामे अद्याप पुर्ण झालेली नाहीत. सदरची कामे सार्व.बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत पुर्ण होणार आहेत. तसेच गल्ली.नं. १ ची स्थळपाहणी केली असता, या रस्त्याचे काम यापुर्वीच पुर्ण झालेचे दिसून येते. त्यामुळे सदर गल्ली.नं. १ मध्ये पुन्हा नव्याने डांबरीकरण करणेची आवश्यकता नाही. त्यामुळे या रस्त्याऐवजी ए.एस.सी. कॉलेज पश्चिम बाजूकडील चौरसीया घर ते हळदीकर घर / काजवे हॉस्पिटल पर्यंतचा रस्ता म्हणजेच पाटील गल्ली या रस्त्याचे डांबरीकरणाचे कामे करून घ्यावे म्हणून श्री. अजित बाळकृष्ण जाधव (माजी नगरसेवक, इ.न.पा.) यांनी व श्री. नितेश पोवार, नगरसेवक यांनी केली आहे. तसेच प्र.क्र. १२ मधील म्हेतर घर ते प्रकाश पाटील घर या ठिकाणी मंजुर असलेली गटर सध्या आवश्यक नसलेने सदर गटर यशवंत कॉलनी येथे कारंडे घर ते प्रकाश बोरा घर येथे करणेबाबत सुरेखा अजितमामा जाधव, नगरसेविका व नितेश पोवार, नगरसेवक यांनी पत्राव्दारे मागणी केलेली आहे.

तरी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका हद्दितील प्र.क्र. १२ मुरदंडे मळा येथील गल्ली नं १ येथील रस्त्याचे काम यापुर्वी पुर्ण झाले असलेने गल्ली नं १ या रस्त्याएवजी ए एस सी कॉलेज पश्चिम बाजुकडील चौरासीया घर ते हळदीकर घर / काजवे हॉस्पिटल पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणेस, तसेच प्र.क्र. १२ मधील म्हेतर घर ते प्रकाश पाटील घर या ठिकाणी मंजुर असलेली गटर सध्या आवश्यक नसलेने सदर गटर यशवंत कॉलनी येथे कारंडे घर ते प्रकाश बोरा घर येथे करणेसही मंजुरी देणेत येत असुन सार्व. बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन (मा.उपअभियंता) हातकणंगले यांना सदर रस्त्याचे डांबरीकरण व गटरीचे कामाचे नावात बदल करणे बाबत कळविणेत यावे.

सूचक : सु. बा. कणगले

अनुमोदक : सौ. ज. प्र. मिसे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. २७
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. ८ : इचलकरंजी शहरातील वाहतुकीस अडथळा निर्माण करणारी बेवारस वाहने हटविणेबाबत मा. अनिल दे. डाळ्या, उपमहापौर यांनी दि. २७/०२/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेबाबत.

ठराव

मा. उपमहापौर इ.मनपा. श्री. अनिल शांतीदेवी देवकरण डाळ्या यांनी दि. २७/०२/२०२६ चे पत्रानुसार इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक मुख्य रस्त्यावर तसेच ठिकठिकाणी भागात बेवारस स्थितीत वाहने पार्क केलेली आहेत. त्यामुळे शहरात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. विशेषतः सकाळी व सायंकाळी शाळा ऑफिसच्या वेळेत नागरिक व शाळकरी मुलांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

पार्कींगच्या चुकीच्या पद्धतीमुळे व बेवारस वाहनामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब अत्यंत गंभीर असून सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे. सदर परिस्थितीवर प्रभावी तोडगा काढण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची तातडीची बैठक आयोजित करणे गरजेचे आहे असे संदर्भिय पत्रन्वये इकडे कळविले आहे.

या पुर्वी २०२२/२३ रोजी बेवारस वाहने जप्त करण्याची कारवाई आरोग्य विभागामार्फत राबविण्यात आलेली होती त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही होणेकरीता आरोग्य विभागामार्फत संदर्भिया पत्रातील मागणी प्रमाणे बैठक आयोजित करणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी शहरातील वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे बेवारस वाहने हटविणेसाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय व शहर वाहतुक शाखा यांचेशी संपर्क साधुन बेवारस वाहने हटविणेबाबत महानगरपालिकेमध्ये बैठक आयोजीत करुन सदरची वाहने हटविणेबाबतची कार्यवाही करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सदरची वाहने हटविणेपुर्वी दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिर नोटीस देवून संबंधीत वाहन मालक यांना सदरची वाहने हटविणेबाबत कळविणेत यावे. सदर नोटीसीनुसार जे वाहनमालक वाहने हटविणार नाहीत त्यांची वाहने जप्त करणेत यावीत.

सूचक : नि. कि. पोवार

अनुमोदक : सु. बा. कळगते.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. २८
दि. २५/०३/२०२६

विषय क्र. ९ : इचलकरंजी शहरातील विविध भागामध्ये बंद अवस्थेतील व जीर्ण व निरुपयोगी सार्वजनिक शौचालये व इतर भंगार साहित्य यांची तात्काळ विल्हेवाट लावणेबाबत मा. अनिल दे. डाळ्या, उपमहापौर यांनी दि. २७/०२/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेबाबत.

ठराव

इचलकरंजी शहरातील विविध भागामध्ये बंद अवस्थेतील व जीर्ण व निरुपयोगी सार्वजनिक शौचालये व इतर भंगार साहित्य यांची तात्काळ विल्हेवाट लावणेबाबत मा. अनिल दे. डाळ्या, उपमहापौर यांनी दि. २७/०२/२०२६ चे पत्रानुसार मागणी केली आहे.

इचलकरंजी महानगरपालिका घन कचरा व्यवस्थापन विभाग अंतर्गत सार्वजनिक शौचालय स्वच्छता विभाग, स्वच्छता निरिक्षक व प्र. मुकादम यांनी फिरती करून इचलकरंजी शहरातील बंद पडलेली व पूर्णपणे जीर्ण झालेली शौचालये यांचा सर्वे केला आहे. त्यानुसार शहरातील खालील १५ ठिकाणी जीर्ण झालेली शौचालये निदर्शनास आली आहेत.

अ.क्र.	स्क्रॅप करावयाचे शौचालय
१	तोरणा नगर
२	टाकवडे रोड
३	लायकरमळा
४	खंजीरे इंडस्ट्री इस्टेट जवळ
५	के. एल. मलाबादेजवळ नगर
६	शांतीनगर शौचालयजवळ
७	जाधव मळा, लाखेनगर
८	महापालिका कार्यालयमागे
९	शहापुर खण कंजारभाट
१०	शहापुर शाळेमागील
११	महासत्ता चौक काळा वडा जवळ
१२	साईट नं.१०२-२
१३	शहापुर कोकणे घरासमोर
१४	जवाहरनगर बाळकृष्णा चित्रमंदिरजवळ
१५	घोरपडे नाट्यगृह मागे

तरी इचलकरंजी शहरामध्ये वरील प्रमाणे नमुद १५ ठिकाणची जीर्ण झालेली फिरती शौचालये तसेच महानगरपालिका प्रशासकीय इमारत, महापालिका मालकीच्या इतर इमारती, मंगल कार्यालय, प्राथमिक शाळा, रा.छ. शाहु हायस्कुल, योग जिम्नॅशियम हॉल इ. ठिकानचे भंगार साहित्य तसेच अतिक्रमण विभागामार्फत जप्त करणेत आलेले साहित्य यांची तात्काळ ई-लिलाव प्रक्रिया करुन विक्री करणेत यावी.

सूचक : सु. बा. कलागते.

अनुमोदक : नि. कि. जोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका